नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट,नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

श्रीकृष्ण ज्वेलर्स

आभूषणों की ९१.६ के सोने की एक विशेष श्रृंखला।
ग्राहकों के भरोसे के कारण कम समय में ही लोकप्रिय।
हार, चूड़ियाँ, मंगलसूत्र और महाराष्ट्रीयन आभुषण के विक्रेता।
हमारे यहा चांदी के सभी आभूषण मिलते है।

कॉफी हाउस बिल्डिंग, गोकुलपेठ, नागपुर Ph. : 2557429, 2542486

* वर्ष ५२ * अंक २०३ * | * अकोला * | रविवार, दिनांक २५ जानेवारी २०२६ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## थोडक्यात...

### यूट्यूबवर पाहून घेतलेल्या औषधामुळे तरुणीचा मृत्यू



■ **तामिळनाडू :** तामिळनाडूमध्ये वजन कमी करण्यासाठी यूट्यूबवरील माहितीवर विश्वास ठेवून औषध घेतल्यामुळे एका कॉलेज विद्यार्थिनीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना औषध घेण्यापूर्वी योग्य खबरदारी घेण्याचे महत्त्व पुन्हा अधोरेखित करते. मदुराईच्या सेलूर भागातील मीनांबलापुरम येथील कलैयर्सी ही एका खासगी महाविद्यालयात पदवीच्या पहिल्या वर्षात शिकत होती. वजन कमी करण्याच्या हेतूने तिने यूट्यूबवरील एका व्हिडिओत दिलेल्या माहितीनुसार स्थानिक मेडिकल दुकानातून बोरॅक्स खरेदी केले. पोलिसांच्या माहितीनुसार, त्यानंतर तिने ते सेवन केले, आणि काही वेळातच तिला उलटी व बेशुद्ध होण्याची लक्षणे दिसली. तिला एका खासगी रुग्णालयात नेण्यात आले, जिथे तिला उपचार करून घरी पाठवण्यात आले. तरीही रात्री तिची प्रकृती खालावली आणि मदुराई येथील राजाजी सरकारी रुग्णालयात नेत असताना वाटेतच तिचा मृत्यू झाला.

### रेल्वे ट्रॅकवर भीषण स्फोट

■ **फतेहगढ साहिब :** पंजाबमधील फतेहगढ साहिब जिल्ह्यात सरहिंद परिसरात रेल्वे मार्गावर मंगळवारी रात्री उशिरा स्फोट झाल्याने खळबळ उडाली. फतेहगढ साहिब-सरहिंद रेल्वे स्थानकापासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर असलेल्या समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरवर ही घटना घडली. रात्री सुमारे अकराच्या सुमारास एक मालगाडी या मार्गावरून जात असताना खानपूर गेटजवळ अचानक मोठा स्फोट झाला. स्फोटाची तीव्रता इतकी होती की रेल्वे रुळांचा सुमारे बारा फूट भाग पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आणि मालगाडीचे इंजिन मोठ्या प्रमाणात नुकसानग्रस्त झाले.

## चंद्रपूरमध्ये महापौर पद
# धानोरकर गटाच्या पारड्यात
## स्थायी समिती अध्यक्षपद विजय वडेट्टीवार यांच्या गटाकडे

■ **महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २४ :** गटनेत्यावरून चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसमध्ये विकोपाला गेलेला अंतर्गत वाद महाराष्ट्र काँग्रेस प्रभारी रमेश चेन्निथलाजी, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मध्यस्थीतून मिटला आहे. चंद्रपूर महापालिकेत खासदार प्रतिभा धानोरकर गटाचा महापौर विराजित होणार असून चंद्रपूर मध्ये जे समर्थन देतील त्यांना उपमहापौर पद देण्याचा निर्णय पक्षश्रेष्ठींकडून घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस प्रभारी रमेश चेन्निथलाजी, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार प्रतिभा धानोरकर, काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांची बैठक पार पडली. या बैठकीतून चंद्रपूरचे महापौर पद हे प्रतिभा धानोरकर गटाकडे देण्यात येईल व प्रदेशाध्यक्ष यांच्या म्हणण्यानुसार गटनेता ठरविण्यात येईल असा निर्णय झाला. निर्णयानुसार स्थायी समिती अध्यक्षपद विजय वडेट्टीवार यांच्या गटाकडे दिल्या जाणार आहे.

चंद्रपूर महापालिकेमध्ये ३४ हा बहुमताचा आकडा मिळविण्यासाठी चार नगरसेवकांची आवश्यकता आहे. हा बहुमताचा आकडा जुळविण्याची जबाबदारी प्रतिभा धानोरकर यांच्याकडे राहणार आहे. काँग्रेस मधील २७ नगरसेवकांपैकी तेरा नगरसेवकांचा पाठिंबा प्रतिभा धानोरकर यांना आहे तर १४ नगरसेवकांचा पाठिंबा विजय



वडेट्टीवार यांच्याकडे आहे.

गटनेत्यासाठी बहुमताचा आकडा आपल्याकडे असल्याचा दावा प्रतिभा धानोरकर यांनी केला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या गटाचा गटनेता होणार असल्याचे त्या म्हणाल्या.

गेली पंचवीस वर्ष काँग्रेस पक्षासाठी काम करत असताना पक्षासाठी जे योग्य तो निर्णय घेणार असल्याचे वडेट्टीवार म्हणाले. पक्षाचा नेता म्हणून संयमी भूमिका घ्यावी लागते, कोणी टीका केली, शिव्या दिल्या तरी आपले काम करावे लागते. यावेळी देखील पक्षासाठी दोन पावले मागे घेतल्याचे काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी नागपुरात माध्यमांना उत्तर देताना स्पष्ट केले.

चंद्रपुरात उद्भवलेल्या स्थितीत भाजपने सत्ता स्थापनेसाठी हालचाली सुरू केल्या असून नगरसेवकांना विविध प्रलोभने दिली जात आहे. नगरसेवकांना एक कोटी रुपये, पद देण्याचे दाखवण्यात आल्याचा गंभीर आरोप वडेट्टीवार यांनी केला.

### चंद्रपुरात भाजपचाच महापौर बसणार!



चंद्रपूरच्या राजकारणाबाबत भाष्य करताना फुकेंनी ठाम दावा केला की, "चंद्रपुरात १०० टक्के भाजपचीच सत्ता येईल आणि भाजपचाच महापौर होईल." काँग्रेसमध्ये सध्या मोठे गट-तट पडले असून, शहराला स्थिर सरकार देण्यासाठी काँग्रेसचा एक गट फुटून भाजपकडे येऊ शकतो, असे सूचक संकेतही परिणय फुके यांनी यावेळी दिले. भाजपच्या वाढत्या प्रभावामुळे विरोधक पूर्णपणे अस्वस्थ झाले असून, आगामी निवडणुकांतही जनता भाजपलाच कौल देईल, असा विश्वास परिणय फुके यांनी व्यक्त केला.

### २०२६ च्या टी २० विश्वचषकातून
# बांगलादेश बाहेर

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :** आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये मोठा निर्णय घेत २०२६ च्या आयसीसी पुरुष टी२० विश्वचषकातून बांगलादेशला अधिकृतपणे बाहेर काढण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने बांगलादेश क्रिकेट बोर्डाला पत्र पाठवून हा निर्णय कळवला असून त्यांच्या जागी स्कॉटलंडचा समावेश करण्यात आल्याची पुष्टी केली आहे. आयसीसीच्या या निर्णयामुळे जागतिक क्रिकेट वतुर्ळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. स्कॉटलंडला आता स्पर्धेतील गट क मध्ये स्थान देण्यात आले असून त्यांचा सामना इंग्लंड, वेस्ट इंडिज, नेपाळ आणि इटलीसारख्या संघांशी होणार आहे. बांगलादेश आणि आयसीसी यांच्यात गेल्या जवळपास तीन आठवड्यांपासून सुरू असलेला वाद अखेर या टोकाच्या निर्णयापर्यंत पोहोचला.

बांगलादेशने भारतात विश्वचषकाचे सामने खेळण्यास नकार देत आपले सामने श्रीलंका किंवा पाकिस्तानमध्ये हलवण्याची मागणी केली होती. मात्र, आयसीसीने ठाम भूमिका घेत स्पर्धेचे सर्व नियोजित सामने भारतातच होतील, असे स्पष्ट केले. या मुद्द्यावर आयसीसी बोर्डात मतदान घेण्यात आले, ज्यामध्ये १४ विरुद्ध २ अशा बहुमताने बांगलादेशचे सामने भारतातच आयोजित करण्याचा निर्णय झाला. स्वतंत्र सुरक्षा अहवालात भारतातील सामन्यांसाठी धोका कमी ते मध्यम असल्याचे नमूद करण्यात आले होते. तरीही बांगलादेश क्रिकेट बोर्ड आपल्या भूमिकेवर ठाम राहिल्याने अखेर आयसीसीने कठोर पाऊल उचलले. हा वाद आयपीएल लिलावानंतर अधिक चिघळला होता. कोलकाता नाईट रायडर्सने बांगलादेशी वेगवान गोलंदाज मुस्तफिजूर रहमानला मोठ्या रकमेत संघात घेतल्यानंतर भारतात काही ठिकाणी निषेध झाला. त्यानंतर बीसीसीआयने रहमानला आयपीएलमधून मुक्त केले, ज्यामुळे बांगलादेश क्रिकेट बोर्ड संतप्त झाला. याच पार्श्वभूमीवर बांगलादेशने टी२० विश्वचषकावर बहिष्कार टाकण्याची धमकी दिली होती.

### पाकिस्तानही टी२० वर्ल्ड कपमधून बाहेर पडू शकतो

पाकिस्तानही टी-२० विश्वचषकातून बाहेर पडू शकतो. पाकिस्तान क्रिकेट बोर्डचे प्रमुख मोहसिन नकवी म्हणाले, आयसीसीने बांगलादेशसोबत चुकीचे वर्तन केले. आम्ही आता सरकारच्या निर्णयाची वाट पाहत आहोत, जर त्यांनी नकार दिला तर आम्हीही स्पर्धेत खेळणार नाही.

## १९ वर्षांखालील विश्वचषकात भारताचा सलग तिसरा विजय

■ **वृत्तसंस्था, बुलावायो, दि. २४ :** झिम्बाब्वेच्या बुलावायो येथे सुरू असलेल्या १९ वर्षांखालील विश्वचषकात भारताने सलग तिसरा विजय मिळवला. शनिवारी संघाने न्यूझीलंडचा ७ विकेट्सने पराभव केला. भारतीय संघाने १३.३ षटकांत ३ विकेट्सच्या मोबदल्यात १३० धावांचे सुधारित लक्ष्य गाठले.

कर्णधार आयुष म्हात्रेने २७ चेंडूत ५३ धावा केल्या. त्याच्या खेळीत २ चौकार आणि ६ षटकारांचा समावेश होता. आयुष व्यतिरिक्त, वैभव सूर्यवंशीने २३ चेंडूत ४० धावा केल्या. त्याने २ चौकार आणि ३ षटकार मारले. दोघांनी अर्धशतक भागीदारी केली.

नाणेफेक गमावल्यानंतर आणि प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, न्यूझीलंड ३६.२ षटकांत १३५ धावांवर सर्वबाद झाला. आरएस अम्ब्रिसने ४ विकेट्स घेतल्या, तर हेनिल पटेलने ३ विकेट्स घेतल्या. न्यूझीलंडकडून कॅलम सॅमसनने नाबाद ३७ आणि सेल्विन संजयने २८ धावा केल्या.

## सोनापूरच्या सरपंच जया सातपूते
### प्रजासत्ताक दिनाच्या दिल्लीतील विशेष अतिथी

■ **महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २४ :** २६ जानेवारीला ७६ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचा सोहळा दिल्ली येथे होणार आहे.या सोहळ्यासाठी विशेष अतिथी म्हणून राज्यातील सोळा सरपंचांची निवड करण्यात आली आहे. यात चंद्रपूर जिल्हयातील सोनापूर देशपांडे ग्रामपंचायतीच्या सरपंच जया दिपक सातपुते यांना हा सन्मान मिळाला आहे. त्यांना मिळालेल्या या विशेष मानामुळे परिसरात अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

सोनापूर देशपांडे हे चंद्रपूर जिल्हयातील गोंडपिपरी तालुक्यातील तेंलगणा सिमेलगत असलेल छोटस गावं आहे. जया दिपक सातपुते या गावच्या सरपंच आहेत. त्यांनी येथे विविध नाविण्यपूर्ण उपक्रम राबविले आहे. गावाचा सर्वांगिंण विकास साधण्याचे उधिष्टये ठेवीत त्यांनी प्रभावी नियोजन केले. हागणदारी गाव अंतर्गत स्वच्छ भारत मिशन मोहिम त्यांनी यशश्वी केली. स्मार्ट ग्राम अभियानात उत्कृष्ट कार्य करित २०१९-२० मध्ये या ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक पटकविला.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचा तालुकास्तरीय पुरस्कार पटकविला.केंद्र शासनाच्या पेपरलेस अभियानात अतिशय उत्तम कामगिरी करित चंद्रपूर जिल्हयातून पहिली पेपरलेस ग्रामपंचायतीचा मान जया सातपुते यांच्या नेतृत्वात ग्रामपंचायत सोनापूरला मिळाला. गावातील शाळा आदर्श होण्याच्या मार्गावर असून महिला बचत गटांच्या माध्यमातून रोज ग्रामसफाईचे काम गावात केली जातात. सौर उर्जेचा वापर करित स्वतंत्र पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत करण्यात आली आहे. याचसोबत ग्रामविकासाचे अनेक कामे जया दिपक सातपुते यांच्या नेतृत्वात करण्यात आली आहेत. त्यांच्या या कार्याने तेलंगणा सिमेवरील या छोटयाशा गावाने संपूर्ण राज्यात आपल्या कामाचा डंका वाजविला आहे. येत्या २६ जानेवारी रोजी दिल्ली येथे ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन अतिशय उत्साही वातावरणात संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्यातील फक्त सोळा सरपंचाना विशेष अतिथी म्हणून सन्मान दिला जाणार आहे.

जया सातपुते व त्यांचे पती दिपक सातपुते या दोघांनाही या कार्यक्रमाचे निमंत्रण केंद्रातून धाडण्यात आले आहे. एका अतिशय लहानश्या गावातील सरपंचांना त्यांच्या कार्यकुशलतेच्या बळावर हा सन्मान मिळाल्याची बातमी समोर आल्यानंतर त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## १५० दिवसांचा कृती आराखडा अंतिम टप्प्यात



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :** विकसित महाराष्ट्र, ई-गव्हर्नन्स विषयक सुधारणा आणि सेवा विषयक प्रशासकीय सुधारणा या तीन बाबींवर आधारित १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत विविध १० स्तरांवरील शासकीय कार्यालयांचे मूल्यमापन अंतिम टप्प्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी एक्स समाज माध्यमातून याविषयी माहिती दिली. यात सर्वोत्कृष्ट कार्यालयांची नावे सोमवारी प्रजासत्ताकदिनी जाहीर केली जाणार आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुरुवातीला १०० दिवसांचा प्रशासकीय सुधारणा आणि धोरणात्मक बाबींवर आधारित कार्यक्रम जाहीर केला होता. या कार्यक्रमाच्या अंतर्गत राज्यातील कार्यालयाची वेबसाइट, आपले सरकार प्रणाली, ई-ऑफीस, कार्यालयाचा डॅशबोर्ड, व्हॉट्सॲप चॅटबॉट, एआय, ब्लॉकचेनचा वापर आणि जीआयएसचा वापर अशा सात मुद्यांवर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कार्यालयांचे दुसऱ्या टप्प्यातील मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद तर्फे करण्यात येत आहे.

यातून राज्यातील प्रत्येकी पाच जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, महापालिका कार्यालये निवडली जातील. याशिवाय ३ पोलीस आयुक्त, प्रत्येकी २ विभागीय आयुक्त आणि पोलीस परिक्षेत्र महानिरीक्षक कार्यालये सर्वत्कृष्ट म्हणून निवडली जाणार आहेत. तसेच सात राज्यस्तरीय आयुक्तालये/संचालनालये, १० राज्यस्तरीय मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, अभिकरणे, शासकीय / निमशासकीय संस्था, शासकीय कंपन्या आणि ७ मंत्रालयीन विभाग निवडले जाणार आहेत.

## चार दहशतवाद्यांना अटक

■ **वृत्तसंस्था, पंजाब, दि. २४ :** प्रजासत्ताक दिनाच्या स्वागताच्या पार्श्वभूमीवर पंजाब पोलिसांनी मोठा दहशतवादी कट उधळला आहे. होशियारपूरमध्ये पोलिसांनी पाकिस्तानच्या 'आयएसआय' समर्थित प्रतिबंधित संघटना बब्बर खालसा इंटरनॅशनलशी संबंधित एक मोठा मॉड्यूल फोडला असून, चार दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत सुमारे २.५ किलो आरडीएक्सने भरलेले आयईडीसह दोन पिस्तूलही जप्त करण्यात आल्या आहेत.

पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या दहशतवाद्यांची नावे दिलजोत सिंह, हरमन सिंह उर्फ हॅरी, अजय उर्फ माहिरा आणि अर्शदीप सिंह उर्फ अर्श कंडोला अशी आहेत. हे चारही आरोपी एसबीएस नगर जिल्ह्यातील राहों भागाचे रहिवासी आहेत.

हा मॉड्यूल अमेरिकेत बसलेल्या इडकच्या हँडलर्सद्वारे चालवला जात होता. प्राथमिक तपासात समोर आले आहे की, प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमांना लक्ष्य करून मोठा दहशतवादी हल्ला करण्यासाठी या आयईडीचा वापर होणार होता. अमेरिकेतून या हँडलर्सनी दहशतवाद्यांना सूचना दिल्या, तर पाकिस्तानची गुप्तचर संघटना 'आयएसआय' त्यांना स्फोटके पुरवत होती. होशियारपूरचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक संदीप मलिक यांनी सांगितले की, गुप्तचर माहितीच्या आधारे होशियारपूर पोलीस आणि सीआय जालंधरच्या पथकांनी ही संयुक्त कारवाई केली आहे. पोलिसांनी स्पष्ट केले की, ही टोळी पंजाबमधील शांतता भंग करण्यासाठी तसेच 'टार्गेटेड किलिंग' करण्यासाठी तयार केली गेली होती.

## केमिकल कंपनीत आग

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :** मुंबईतील औद्योगिक पट्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महापे एमआयडीसी परिसरात शनिवारी दुपारी अचानक भीषण आगीची घटना घडली. येथील बिटाकेम नावाच्या केमिकल कंपनीला लागलेल्या आगीमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली. दुपारच्या सुमारास ही आग लागली असून, काही क्षणांतच आगीने उग्र रूप धारण केले. आगीच्या ज्वाळा इतक्या भयानक होत्या की त्या बहुमजली इमारतींच्या उंचीपेक्षाही मोठ्या दिसत होत्या. आगीमुळे निर्माण झालेले धुराचे प्रचंड लोळ दूरवरूनही स्पष्टपणे दिसत होते. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, महापे एमआयडीसीतील W-१७७ क्रमांकाच्या बिटाकेम या केमिकल कंपनीत ही आग लागली. या कंपनीत रासायनिक पदार्थांचा साठा असल्यामुळे आगीचा फैलाव झाला. आगीची तीव्रता पाहता सुरुवातीपासूनच परिस्थिती गंभीर असल्याचे चित्र होते.

## जयपूरमध्ये भरधाव थारने २ जणांना चिरडले

■ **वृत्तसंस्था, जयपूर, दि. २४ :** जयपूरमध्ये शनिवारी भरधाव वेगातील थारने आधी एका तरुणीला धडक दिली, नंतर दुचाकीस्वार तरुणाला चिरडले. या अपघातात तरुणाचा मृत्यू झाला, तर जखमी तरुणीला सवाई मानसिंह (रटर) रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. धडकेनंतर दुचाकीस्वार तरुण थार गाडीखाली अडकला होता.

आजूबाजूच्या लोकांनी मोठ्या प्रयत्नाने तरुणाला बाहेर काढले. पोलिसांनी घटनास्थळावरून थार जप्त केली आणि नंतर फरार चालकाला पकडले. हा अपघात जयंती मार्केट चौकाजवळ शनिवारी दुपारी सुमारे १२:४५ वाजता झाला होता. याचे सीसीटीव्ही फुटेजही समोर आले आहे.

अपघात पोलीस ठाणे (उत्तर) चे हेड कॉन्स्टेबल राजेंद्र यांनी सांगितले - थारने दुचाकीस्वार फैजान (२७) ला चिरडले. त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर पायी चालणारी कुलसुम (१९) गंभीर जखमी झाली. अपघातानंतर चालक थार सोडून पळून गेला. जालूपुरा पोलीस ठाणे आणि अपघात पोलीस ठाणे पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून फैजान आणि कुलसुम यांना एसएमएस रुग्णालयात पाठवले. डॉक्टरांनी तपासणीनंतर फैजानला मृत घोषित केले.

## फडणवीस भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन पुढे जात आहेत

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :** महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागानंतर आता सक्तवसुली संचालनालयाच्या केसमध्येही मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, या निर्णयामुळे सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी संताप व्यक्त केला आहे. "छगन भुजबळांवरील सर्व प्रकरणे संपलेली नाहीत, त्यांना कोणतीही क्लीन चिट मिळालेली नाही. आम्ही या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात दाद मागणार आहोत," असे त्यांनी सांगितले. तसेच फडणवीस सगळ्या भ्रष्टाचारांना घेऊन पुढे जात आहेत, असा आरोपही त्यांनी केला.



पत्रकार परिषदेत बोलताना अंजली दमानिया यांनी भुजबळांविरुद्धच्या कायदेशीर लढाईचा पाढा वाचला. त्या म्हणाल्या, २०१४ साली मी छगन भुजबळांविरोधात जनहित याचिका दाखल केली. एकूण ११ घोटाळ्यांचा त्यात उल्लेख होता. त्यातून तीन गुन्हे दाखल झाले. त्यापैकी दोन प्रकरणांमध्ये दिलासा मिळाला असला, तरी एक महत्त्वाचं प्रकरण अद्याप प्रलंबित आहे. कोर्टासमोर संपूर्ण व योग्य माहिती मांडली गेली नाही, त्यामुळे असे निर्णय झाले असावेत.

दमानिया यांनी यावेळी सत्ताधारी आणि माजी सरकारांवरही गंभीर आरोप केले. महाराष्ट्र सदन घोटाळ्यात भुजबळ यांना आधी उद्धव ठाकरे सरकारने वाचवलं आणि आता देवेंद्र फडणवीस सरकारने वाचवलं. एसीबीने या प्रकरणात अपील करणं अपेक्षित होतं, मात्र तसं झालं नाही. सगळे एका माळेचे मणी आहेत, असा आरोप त्यांनी केला. त्यांनी सांगितलं की, ३१ मार्च २०२२ रोजी ठाकरे सरकारने अपील संदर्भातील शासन निर्णय रद्द केला होता. त्यानंतर एप्रिल २०२३ मध्ये पुन्हा अपील करण्याचा शासन निर्णय काढण्यात आला. तरीही महाराष्ट्र सदन घोटाळ्याचं प्रकरण पूर्णपणे संपलेलं नाही. अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही जोरदार टीका केली. भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्राचा नारा देणारे फडणवीस आज भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन पुढे जात आहेत. भाजपची हीच मोडस ऑपरेंडी आहे. आधी आरोप करा, तपास यंत्रणा लावा आणि नंतर त्यांनाच पक्षात सामावून घ्या, असा आरोप त्यांनी केला.

## उमेदवारांच्या पतीवर प्राणघातक हल्ला

■ **वृत्तसंस्था, सांगली, दि. २४ :** जिल्हा परिषद निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या उमेदवारांच्या पतीवर प्राणघातक हल्ला झाल्याची घटना शनिवारी रात्री वाळवा तालुक्यातील बहादुरवाडी येथे घडली. या हल्ल्यात तीन जण जखमी झाले असून याबाबत आठ संशयिताविरूध्द आष्टा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. येलूर (ता. वाळवा) या जिल्हा परिषद गटातून उमेदवारी दाखल केलेल्या महिला उमेदवार देविका घोरपडे यांचे पती भोजराज घोरपडे यांच्यासह तिघांवर तलवार व सत्तूरने वार करण्यात आला आहे. जिल्हा परिषद निवडणुकीचा प्रचार शुभारंभ झाल्यानंतर रस्त्याकडेला असलेल्या घोरपडे यांच्या हॉटेलमध्ये वाद सुरू होता. हा वाद मिटवण्याच्या प्रयत्नात असताना घोरपडे यांच्यावर पाठीमागून डोक्यावर धारदार हत्याराने वार करण्यात आले.

### न्यायप्रिय व्यक्ती सर्वोच्च पदावर असतील, तोपर्यंत लोकशाही सुरक्षित
# न्यायाधीश सूर्यकांत यांचा सत्कार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २४ :** न्यायप्रिय व्यक्ती देशाच्या सर्वोच्च पदावर असतील, तोपर्यंत आपल्या संविधानाला आणि लोकशाहीला कोणताही धोका नाही, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या सन्मानार्थ मुंबई उच्च न्यायालयात आयोजित भव्य सत्कार सोहळा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. त्याप्रसंगी ते बोलत होते.



आधी अवघा ९ टक्के असलेला महाराष्ट्राचा दोषसिद्धी दर आज ४५ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे आणि तो ६० टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, सर्वसामान्यांना न्याय मिळण्यासाठी पायाभूत सुविधांवर भर देण्यात येत आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले. याचवेळी, कोल्हापूरच्या बहुप्रतीक्षित सर्किट बेंचला त्यांच्या कार्यकाळातच पूर्ण बेंचचा दर्जा देण्याची विनंती त्यांनी सरन्यायाधीशांकडे केली. यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील नागरिकांना न्याय अधिक जलद आणि सुलभपणे मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुंबई उच्च न्यायालयाच्यावतीने आयोजित या ऐतिहासिक कार्यक्रमात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी न्याय, संविधान आणि सामाजिक समतेच्या मूल्यांवर आधारित भारताच्या न्यायव्यवस्थेचा गौरव केला. न्यायमूर्ती सूर्यकांत यांचे कार्य सूर्याप्रमाणे प्रकाशमान असून सामान्य नागरिकांना न्यायाची ऊर्जा देणारे आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

महाराष्ट्र आणि हरियाणा या दोन्ही राज्यांच्या शौर्यपरंपरेचा उल्लेख करत शिंदे यांनी दोन्ही भूमींच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशावर भाष्य केले. देश आज सुरक्षित आहे, कारण आपल्या सीमांवर जवान डटून उभे आहेत आणि शेतकऱ्यांच्या श्रमातून समृद्धी निर्माण होत आहे, असे त्यांनी सांगितले. हरियाणातील मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेल्या न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि न्यायनिष्ठेच्या बळावर देशाच्या सर्वोच्च न्यायपीठापर्यंत मजल मारल्याचे नमूद करत, शिंदे यांनी त्यांच्या जीवनप्रवासाला प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायी ठरवले.

धारा ३७० रद्द करण्याचा निर्णय, वन रँक वन पेन्शन योजना, मतदार याद्यांशी संबंधित महत्त्वाचे आदेश, महिलांसाठी आरक्षणा संदर्भातील निर्देश तसेच अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत दिलेले ठाम निर्णय यांचा उल्लेख करत त्यांनी न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या न्यायनिष्ठेचे कौतुक केले. आपल्या निर्णयांमुळे जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे, असे ते म्हणाले. पर्यावरणपूरक विकासावर भर देताना शिंदे यांनी चारधाम प्रकल्पासारख्या निर्णयांचे उदाहरण दिले. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हीच आजची खरी गरज आहे. पर्यावरण संवेदनशील विकासाची दिशा आपल्या निर्णयांतून स्पष्टपणे दिसते, असे शिंदे यांनी नमूद केले.

राज्यातील न्यायव्यवस्थेच्या पायाभूत सुविधांबाबत माहिती देताना त्यांनी सांगितले की, २०२२ पासून राज्यात ३२ नवीन न्यायालयांची स्थापना करण्यात आली असून त्यात १४ अतिरिक्त सत्र न्यायालयांचा समावेश आहे. मुंबई उच्च न्यायालयासाठी नव्या भव्य इमारतीच्या उभारणीसाठी हजारो कोटी रुपयांचा खर्च करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# आता धरणांच्या पाण्यावर तयार होणार वीज

## राज्यात मोठ्या प्रमाणावर 'फ्लोटिंग सोलर' प्रकल्प उभारणार : जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २४ :**

राज्यातील सिंचन प्रकल्प आणि धरणांच्या जलाशयांचा वापर आता हरित ऊर्जा निर्मितीसाठी केला जाणार आहे. जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी ही माहिती दिली. कृष्णा आणि गोदावरी खोरे विकास महामंडळांतर्गत येणाऱ्या धरणांवर मोठ्या प्रमाणावर तरंगते सौर प्रकल्प (फ्लोटिंग सोलर) उभारून महाराष्ट्राला हरित ऊर्जेत आघाडीवर आणण्याचा विभागाचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.



मंत्री विखे पाटील हे जलसंपदा विभागाने पुणे येथे आयोजित केलेल्या 'हरित ऊर्जा उपयोजन' या धोरणात्मक परिषदेत बोलत होते. या परिषदेला जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी, उद्योजक, मित्र संस्थेचे वरिष्ठ अधिकारी आणि ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते.

वाढत्या ऊर्जेची गरज भागवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सिंचन पायाभूत सुविधांचा धोरणात्मक वापर करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असे मंत्री विखे पाटील यांनी नमूद केले. फ्लोटिंग सोलर प्रकल्पांमुळे जमिनीच्या अधिग्रहणाची गरज भासणार नाही, ज्यामुळे शेतीसाठी जमिनीचे संरक्षण होईल. याशिवाय, जलाशयावर सौर पॅनेलचे आच्छादन असल्याने बाष्पीभवनाचे प्रमाण कमी होऊन पाण्याचे संवर्धन होईल. याचा थेट फायदा शेतकरी आणि ग्रामीण समुदायाला होईल, असा विश्वास श्री. विखे पाटील यांनी व्यक्त केला.

या परिषदेत सौर ऊर्जा क्षेत्रात कार्यरत असलेल्या मोठ्या कंपन्या आणि अनेक वैयक्तिक विकासकांनी सहभाग नोंदवला. तरंगत्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या सुरक्षिततेसाठी आणि कार्यक्षमतेसाठी उच्च दर्जाचे तांत्रिक निकष या बैठकीत प्रामुख्याने चर्चिले गेले.

या योजना राबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी पारदर्शक पीपीपी (सार्वजनिक-खाजगी भागीदारी) मॉडेल विकसित करणे आवश्यक असल्याचे मत उपस्थित प्रतिनिधींनी व्यक्त केले.

उद्योजकांनी केलेल्या सूचना विचारात घेऊन, या तरंगत्या सौर प्रकल्पांसाठी जलसंपदा विभाग 'नोडल एजन्सी' म्हणून काम करण्याबाबत विचार करेल. जलसंपदा विभागाच्या जलाशयांवर तरंगत्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या या उपक्रमामुळे महाराष्ट्र केवळ ऊर्जेत स्वयंपूर्ण होणार नाही, तर हवामान बदलाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी एक आदर्श मॉडेल म्हणून समोर येईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार रूपाली ठोंबरे यांच्यासह समर्थकांवर गुन्हा दाखल

**■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २४ :**



पुणे महापालिका निवडणुकीच्या मतमोजणीदरम्यान मतदान केंद्रात गोंधळ घालून निवडणूक प्रक्रिया तसेच शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार रूपाली ठोंबरे यांच्यासह त्यांच्या काही समर्थकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना 16 जानेवारी रोजी दुपारी सुमारे 12 वाजता टिळक रस्त्यावरील डी.ई.एस. न्यू इंग्लिश स्कूल येथे घडली.

याप्रकरणी कसबा-विश्रामबाग वाडा क्षेत्रीय कार्यालयातील उपअभियंता सुधीर पांडुरंग आलुरकर (वय 52, रा. पिंपळे गुरव) यांनी विश्रामबाग पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार रूपाली ठोंबरे यांच्यासह इतर काही उमेदवार व त्यांच्या समर्थकांविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मतमोजणी सुरू असताना ठोंबरे यांनी त्यांच्या हरकत अर्जाची पोहोच देण्याची मागणी करत मतमोजणी केंद्रात उभारलेल्या सुरक्षा जाळीवर चढून जोरदार घोषणाबाजी व आरडाओरड केली. यावेळी त्यांच्यासोबत असलेल्या इतर उमेदवार व प्रतिनिधींनीही गोंधळ घालत निवडणूक प्रक्रियेत अडथळा निर्माण केला. सुरक्षेसाठी उभारलेल्या व्यवस्थेचा भंग करून मतमोजणी कामकाजात जाणीवपूर्वक व्यत्यय आणल्याने काही काळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

दरम्यान, पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपने सर्व पक्षांना मागे टाकत स्पष्ट वर्चस्व प्रस्थापित केले आहे. शहरात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यात प्रमुख लढत होती. या निवडणुकीत भाजपने 119 जागांवर विजय मिळवत महापालिकेवर एकहाती सत्ता स्थापन केली आहे. या पराभवामुळे अजित पवार गटातील अनेक प्रमुख नेत्यांना धक्का बसला असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी प्रवक्त्या रूपाली पाटील ठोंबरे यांचाही पराभव झाला आहे.

निवडणूक निकालानंतर रूपाली पाटील ठोंबरे यांच्यावर समाजमाध्यमांवरून तीव्र टीका होत असून, याविरोधात त्यांनी कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे. संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्याचा गैरवापर करून बदनामी अथवा अश्लील टिप्पण्या करू नयेत, अन्यथा संबंधितांविरोधात कठोर कायदेशीर कारवाई व गुन्हा दाखल केला जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. तसेच, फेक नॅरेटिव पसरवणाऱ्या व जाणीवपूर्वक गैरसमज निर्माण करणाऱ्या पोस्ट टाळाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# सत्याचा आणि न्यायाचा विजय झाला



**नाशिक :** दिल्लीतील महाराष्ट्र सदनच्या बांधकामाशी संबंधित सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दाखल केलेल्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणातून राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) मंत्री छगन भुजबळ यांच्यासह मुलगा पंकज भुजबळ आणि पुतण्या समीर भुजबळ यांची विशेष न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. या निकालावर आता मंत्री भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली. सत्याचा आणि न्यायाचा विजय झाला असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मागील काही वर्षांपासून महाराष्ट्र सदन कथित घोटाळ्याचे प्रकरण गाजत होते. छगन भुजबळ हे सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना त्यांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी महाराष्ट्र सदनाच्या बांधकामासाठी के. एस. चमणकर या बांधकाम कंपनीला कंत्राट दिले. त्या मोबदल्यात भुजबळ कुटुंबीयांना लाच मिळाली होती, असा तपास यंत्रणेचा आरोप होता. या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला होता. पुढील काळात त्या आधारे ईडीने भुजबळ यांच्याविरुद्ध तपास सुरू केला. या प्रकरणी भुजबळ यांना अटकही केली गेली. या कारवाईचे पडसाद नाशिकसह राज्यात उमटले होते.

# पुण्यात भाजप नगरसेविकेच्या भावाला बेदम मारहाण

**■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २४ :**

पुण्यातील भवानी पेठेतील कासेवाडी परिसरात भारतीय जनता पक्षाच्या नगरसेविका मृणाल कांबळे यांच्या भावाला राजकीय फलक लावण्यावरून झालेल्या वादातून बेदम मारहाण करण्यात आली. या प्रकरणी 14 ते 15 जणांविरुद्ध खडक पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

शंतनू पांडुरंग उर्फ बापू कांबळे (वय 30, रा. एसआरए वसाहत, लोहियानगर, महात्मा फुले पेठ) यांनी खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. युवराज अडसूळ, अक्षय अडसूळ, सतीश साठे, विक्रम खेनट (सर्व रा. कासेवाडी, भवानी पेठ), प्रवीण फैजी, राहुल मोहिते (दोघे रा. लोहियानगर, महात्मा फुले पेठ) यांच्यासह अन्य 14 ते 15 जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महापालिका निवडणुकीत कासेवाडी-भवानी पेठ प्रभागातून भाजपच्या उमेदवार मृणाल कांबळे निवडून आल्या होत्या. विजयानंतर मतदारांचे आभार मानण्यासाठी कांबळे यांचे कार्यकर्ते कासेवाडी भागात फलक लावत होते.

त्यावेळी भाजपच्या नवनिर्वाचित नगरसेविका अर्चना पाटील यांचे पती तुषार पाटील यांचे कार्यकर्ते घटनास्थळी आले. त्यांनी शंतनू कांबळे यांना या भागात फलक लावू नका असे सांगितले. यानंतर टोळक्याने शंतनू कांबळे यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करत जखमी केले.

कासेवाडीत फलक लावल्यास जिवे मारण्याची धमकीही देण्यात आल्याचे शंतनू कांबळे यांनी फिर्यादीत सांगितले आहे. या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक शशिकांत चव्हाण यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन परिस्थितीची पाहणी केली तसेच तणाव कमी करण्याचा प्रयत्न केला.सहायक पोलिस निरीक्षक हर्षल कदम या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# अंधाधुंदपणे गोळ्या झाडून तरुणाची निर्घृण हत्या

**■ वृत्तसंस्था, जालना, दि. २४ :**

जालना शहर शुक्रवारी रात्री ८.३० च्या गोळीबाराच्या घटनेने हादरून गेले. जालना शहरातील नूतन वसाहत भागातील घाटी रुग्णालय परिसरात एका तरुणावर दुचाकीवरून आलेल्या तीन जणांनी अंधाधुंद गोळीबार केला. या घटनेमध्ये गंभीर जखमी तरुणाला तातडीने एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु रात्री १०.३० च्या सुमारास उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. चरण रायमल (वय २८, रा. घाटी परिसर, जालना शहर) असे मृत तरुणाचे नाव आहे.



तरुणावर गोळीबार झाल्याच्या घटनेची माहिती मिळताच जालन्याचे पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, उपअधीक्षक व कदीम जालना ठाण्याच्या प्रमुखांसह अन्य दोन मिळून तीन पोलीस निरीक्षक, पोलिसांचा अन्य ताफा नूतन कॉलनी वसाहतीत दाखल झाला. या घटनेच्या संबंधाने पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांनी सांगितले की, कदीम जालना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नूतन वसाहत भागातील घाटी रोड परिसरात शुक्रवारी रात्री सव्वा आठ ते साडे आठच्या सुमारास एका दुचाकीवरून आलेल्या दोन ते तीन तरुणांनी चरण रायमलु या तरुणावर गोळीबार केला. या घटनेमध्ये चरण रायमलू हा गंभीर जखमी झाला. रुग्णालयात दाखल करताना त्याची प्रकृती चिंताजनक होती. त्याला एका खाजगी रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. आरोपी पकडल्याशिवाय या घटनेचा उलगडा होणार नाही. त्यामुळे प्रत्यक्ष आरोपींना पकडल्यानंतरच नेमकी घटना कुठल्या कारणावरून घडली, नेमकं काय घडले आहे, याची माहिती मिळू शकेल असे पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

# दुचाकी चोरीचा आरोप करत तरुणाला अमानुष मारहाण

**■ वृत्तसंस्था, छत्रपती संभाजीनगर, दि. २४ :**

रात्रगस्तीवर असताना सिडको भागात रस्त्यावर उभ्या तरुणाला पोलिस कर्मचाऱ्यांनी हटकले. त्यावर सिगारेट घेण्यासाठी आल्याचे लक्षात येताच दोन्ही पोलिसांनी त्यांच्याकडील गाडी बुलढाणा पासिंगची असल्याचा ठपका ठेवत ही चोरीची आहे, असा निष्कर्ष काढला. दुचाकी चोरीची नसल्याचे सांगितल्यावर अंमलदारांनी लाठीने मारहाण करून तरूणांच्या पोटात व छातीत लाथ घातली. याप्रकरणी जखमी तरुण अक्षय ज्ञानेश्वर ठोकळ (३२, रा. इंदिरानगर, मुकुंदवाडी) यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला. तर पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी तातडीने मुकुंदवाडी ठाण्याचे गणेश वाघ आणि संतोष बिरारे या दोन्ही अंमलदारांना निलंबित केले.

### शरद पवार-अजित पवार यांचे एकत्रीकरण झाले

# संजय राऊत यांचा दावा



**मुंबई :** महाराष्ट्राच्या सध्याच्या राजकीय परिस्थितीत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी काल भाष्य केले आहे. दोघांच्याही विचारांची दिशा एकाच होती. महाराष्ट्राचा राजकारण हे शिशारी आणणारे आहे. येथे गुलामांचा बाजार भरलेला आहे. हे आम्ही देखील रोज सांगत आहोत. जणू काही माणसाच्या मताला, विचारांना आणि जगण्याला काही किंमतच ठेवलेले नाही. जणू काही सर्व भ्रष्ट पैशाने तोडले जात आहेत. भारतीय जनता पक्षाचे एकनाथ शिंदे यांच्यासारखे मांडलिक राजे आहेत. ते देखील स्वतःला या राज्याचे राजा समजत आहेत. या गुलामीच्या बाजारात ते देखील बोली लावत आहेत. या गुलामांच्या राज्याचे दोन बादशाह हे दिल्लीमध्ये बसले आहेत. त्यांची गुलामी आम्ही किंवा महाराष्ट्र कधीही पत्करणार नाही, असे संजय राऊत यांनी म्हटले आहे. माननीय शरद पवार आणि अजित पवार यांच्या पक्षाची युती आहे आणि ते एकत्रीकरण आहे. ते जवळजवळ एकत्र झाल्यासारखेच दिसत आहेत. त्यामुळे तो प्रश्न आता विचारण्याला काहीही अर्थ नसल्याचे म्हणत संजय राऊत यांनी या विषयी अधिक बोलणे टाळले आहे. सोलापूरला दोन शिवसेना एकत्रित लढत असतील तर याची माहिती माझ्याकडे नाही.

# राज ठाकरे महाराष्ट्राचे राजे आहेत का?

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २४ :**



**बिहारी मंत्र्यांचे ठाकरे बंधूंवर टीकास्त्र**

बिहारचे मंत्री अशोक चौधरी यांनी मुंबईत बिहार भावन बांधण्याच्या मुद्यावरून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह त्यांचे बंधू तथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. बिहार सरकार कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात बिहार भवन बांधेल. या भवनाचे बांधकाम थांबवण्याची ताकद कुणातच नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या नेतृत्वातील बिहार सरकारने मुंबईत बिहार भवन बांधण्याची घोषणा केली आहे. यावरून सध्या मोठा राजकीय वाद सुरु झाला आहे. मनसे व ठाकरे गटाने या भवनाला कडाडून विरोध केला आहे. त्यावर बिहार सरकारचे मंत्री अशोक चौधरी यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. ते म्हणाले, मुंबईत कोणत्याही परिस्थितीत बिहार भवन बांधले जाईल. या भवनाचे काम थांबवण्याची ताकद कुणातही नाही. राज ठाकरे हे निरुपयोगी व्यक्ती आहेत.

या देशात कुणाचाही जबरदस्ती चालणार नाही. बिहार भवन बांधू देणार नाही म्हणतात. राज ठाकरे हे महाराष्ट्रातील राजे आहेत का? निव्वळ फालतू गोष्टी सुरू आहेत. हे भवन महाराष्ट्रात उपचारांसाठी जाणाऱ्या बिहारच्या नागरिकांच्या सोयीसाठी बांधले जात आहे. ते इतरही अनेक राज्यांत बांधण्यात येणार आहेत. बिहार भवन राज्यातील जनतेसाठी असंख्य सुविधा प्रदान करेल. ते कोणत्याही राजकीय अजेंड्याचा भाग म्हणून नाही तर मानवी गरजांना प्रतिसाद म्हणून बांधले जात आहे, असे चौधरी म्हणाले.

दुसरीकडे, ठाकरे गटानेही बिहार भवन हे संसाधनांवरील ओझे व प्रादेशिक राजकारणाने प्रेरित असल्याचा आरोप केला आहे. ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत या प्रकरणी बोलताना म्हणाले, मुंबईची जमीन बळकावण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. उद्या हे लोक वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये गुजरात भवनही बांधतील. खासदार संजय राऊत यांनीही या प्रकरणी संतप्त प्रतिक्रिया दिली.

आता मुंबई महापालिकेत शिवसेना सत्तेत आली आहे. त्यामुळे या मुद्यावर त्यांचे विचार मांडणे ही त्यांची जबाबदारी आहे. शिंदे गट स्वतःला शिवसेना म्हणत असल्याने या मुद्यावर बोलणे व आवश्यक असल्यास निषेध करणे ही त्यांची जबाबदारी आहे, असे राऊत म्हणाले.

सत्ताधारी शिवसेनेचे नेते तथा माजी खासदार संजय निरुपम यांनी बिहार भवनाचे राजकारण करणे चुकीचे असल्याचा आरोप केला आहे. मनसेने बिहार भवनाचा विरोध करणे चुकीचे आहे. ही इमारत कर्करोग रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी बांधली जात आहे.

# महिलेचा खून

**■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २४ :**

मित्राबरोबर अनैतिक संबंध असल्याने महिलेवर चाकूने वार करुन खून करण्यात आल्याची घटना घडली. या प्रकरणी पोलिसांनी एका तरुणाला लोणीकंद पोलिसांनी अटक केली. नम्रता शैलेंद्र व्हटकर ऊर्फ नम्रता चंद्रशेखर इंगळे (वय १९) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. या प्रकरणी शैलेंद्र प्रकाश व्हटकर (वय ३०, रा. बकोरी, ता. हवेली) याला अटक करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नम्रता आणि पठाण हे नगर रस्त्यावरील एका खासगी कंपनीत कामाला होते. तेथे दोघांची ओळख झाली. दोन वर्षांपूर्वी नम्रताचा शैलेंद्र व्हटकर याच्याशी विवाह झाला होता. नम्रता आणि पठाण यांच्यात अनैतिक संबंध असल्याची कुणकुण शैलेंद्र याला लागली होती.

# लाडकी बहीण योजनेसाठी १८१ क्रमांकाची हेल्पाईन

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २४ :**

राज्य सरकारच्या मुख्यमंत्री लाडकी बहिण या योजनेतील लाभार्थ्यांसाठी महत्वपूर्ण घोषणा महिला व बालविकास विभागाने केली. या योजनेतील लाभार्थ्यांनी ई केवायसी पूर्ण केल्यानंतरही अनेक लाभार्थ्यांना हप्ता न मिळणे, ई केवायसी पूर्ण न होणे यासारख्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून या समस्यांचे निराकरण करण्यासाठी १८१ ही हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे. राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी यासंदभार्तील घोषणा एक्सवरून केली.

राज्य सरकारच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील अपात्र लाभार्थ्यांची संख्या लक्षात घेता, महिला व बालविकास विभागाने सर्व लाभार्थ्यांना ई केवायसी पूर्ण करण्याची सक्ती केली होती. त्यानुसार लाभार्थ्यांनी ई केवायसी पूर्ण केल्यानंतरही अनेक लाभार्थ्यांना प्रतिमहिना मिळणारा लाभ मिळत नसल्याची तक्रार गेल्या अनेक दिवसांपासून सुरु झाली होती. त्याशिवाय या योजनेतील इतरही अनेक तक्रारी समोर आल्यामुळे याची गंभीर दखल महिला व बालविकास विभागाने घेतली आहे. परिणामी लाभार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी महिला व बालविकास विभागाकडून १८१ या क्रमांकांची हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे.

राज्याच्या महिला व बालविकास विभागाच्या मंत्री आदिती तटकरे यांनी यासंदभार्तील घोषणा केली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची ईकेवायसी प्रक्रिया करत असताना काही कारणास्तव चुकीचा पर्याय निवडल्याने लाभ स्थगित झाल्याच्या काही तक्रारी विभागास प्राप्त झाल्या आहेत. या योजनेशी संबंधित इतरही तक्रारींचे, शंकांचे फोन कॉलवर निवारण करण्यासाठी १८१ या महिला हेल्पलाइन नंबरवर मदत उपलब्ध करून देण्यात आली आहे. याबाबत संबंधित कॉल ऑपरेटर्सना योग्य ते प्रशिक्षणही देण्यात आले आहे. योजनेशी संबंधित सर्व तक्रारींचे आणि शंकांचे निरसन १८१ या हेल्पलाईन नंबरवरून करण्यात येणार असल्याचे एक्सवरील संदेशात जाहीर केले.

# कौटुंबिक वादातून महिलेचा खून

**■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २४ :**

पुण्यात कौटुंबिक वादातून एका 19 वर्षीय महिलेचा धारदार शस्त्राने वार करून खून करण्यात आला आहे. ही घटना नगर रस्त्यावरील वाडेबोल्हाई गावात घडली असून, पोलिसांनी तिचा पती शैलेंद्र प्रकाश व्हटकर (वय 30) याला अटक केली आहे. मृत महिलेचे नाव नम्रता शैलेंद्र व्हटकर (वय 19, रा. बालाजी सोसायटी, शिरसवाडी, वाडेबोल्हाई) असे आहे. तिचा पती शैलेंद्र व्हटकर (रा. बकोरी, ता. हवेली) याला लोणीकंद पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. शाहरुख दस्तगीर पठाण (वय 23) यांनी या प्रकरणी लोणीकंद पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी शैलेंद्र आणि नम्रता यांच्यात कौटुंबिक कारणांवरून नेहमी वाद होत असत. यावरून त्यांच्यात मोठा वाद झाला. याच वादातून शैलेंद्रने नम्रतावर धारदार शस्त्राने अनेक वार केले. गंभीर जखमी झालेल्या नम्रताला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते राज्यस्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन

**■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २४ :**

पुणे येथे उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत राज्यातील विद्यापीठांशी संबंधित विविध विषयांवर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन झाले. महाराष्ट्रातील उच्च शिक्षण व्यवस्था अधिक गुणवत्तापूर्ण, कौशल्याधारित आणि रोजगाराभिमुख करण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेत धोरणात्मक बाबींवर सखोल चर्चा करण्यात आली.



या कार्यक्रमाला उच्च शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी, राज्य प्रकल्प संचालक राजेंद्र भारुड, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर उपस्थित होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्यासह राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलगुरू, प्राध्यापक आणि शिक्षणतज्ज्ञही यावेळी उपस्थित होते.

उच्च शिक्षण व्यवस्थेच्या बळकटीसाठी या कार्यशाळेत एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले. मंत्री पाटील यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि गांधीनगर येथील इन्फ्लिबनेट केंद्र यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी इन्फ्लिबनेटच्या संचालिका प्रा. डॉ. देविका मदल्ली उपस्थित होत्या.

या सामंजस्य करारानुसार, राज्य संस्थात्मक क्रमवारी प्रणाली आणि राज्य उच्च शिक्षण माहिती व्यवस्थापन प्रणाली या एकात्मिक वेब-आधारित प्रणालींची रचना व विकास केला जाईल. यामुळे उच्च शिक्षणातील गुणवत्ता, पारदर्शकता आणि डेटा-आधारित निर्णय प्रक्रिया अधिक सक्षम होण्यास मदत होईल, असे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी राज्याच्या शैक्षणिक विकासासाठी मानवी भांडवल, अर्थव्यवस्था आणि उच्च शिक्षणाधारित ज्ञान अर्थव्यवस्था या विषयांवर चर्चा झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मुख्य सचिवांच्या पाचव्या राष्ट्रीय परिषदेतील मुद्द्यांच्या अंमलबजावणीबाबत अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी यांनी मार्गदर्शन केले. माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीचा आढावा सादर केला. राज्य प्रकल्प संचालक राजेंद्र भारुड यांनी विद्यापीठांचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील दर्जा सुधारण्यासाठी गुणवत्ता व जागतिक मानांकनावर मार्गदर्शन केले.

# ६ फेब्रुवारीला पुणे महापौर, उपमहापौर निवड

**■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २४ :**

पुणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर महापौर आणि उपमहापौर निवडीची तारीख निश्चित झाली आहे. ही निवड शुक्रवार, ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता होणाऱ्या पहिल्या विशेष सभेत केली जाईल.

महापालिकेच्या नियमांनुसार, सार्वत्रिक निवडणुकीनंतर पहिली सभा घेऊन महापौर आणि उपमहापौरांची निवड करणे बंधनकारक असते. यासाठी तारीख, वेळ आणि पिठासीन अधिकारी निश्चित करण्यासाठी विभागीय आयुक्तांकडे पत्रव्यवहार करण्यात आला होता. विभागीय आयुक्तांशी झालेल्या चर्चेनंतर ही तारीख निश्चित करण्यात आली.

या विशेष सभेत पुणे शहराचा प्रथम नागरिक म्हणून महापौरांची निवड होणार असल्याने राजकीय वतुर्ळात मोठी उत्सुकता आहे. उपमहापौर पदासाठीही चुरशीची लढत अपेक्षित आहे. निवडणूक प्रक्रिया नियमांनुसार पार पडेल आणि सभेचा सविस्तर कार्यक्रम लवकरच जाहीर केला जाईल. महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त नवल किशोर राम यांनी याबाबत माहिती दिली. ते म्हणाले की, सर्व तयारी अंतिम टप्प्यात असून सभेचे आयोजन नियोजित वेळेनुसार केले जाईल. पुणे शहराच्या प्रशासनाच्या दृष्टीने ही सभा अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

### ठाकरे गट, शिंदे गटासह दोन्ही राष्ट्रवादी भाजपविरोधात एकत्र

# बार्शीतील महाआघाडीवर भाजप आक्रमक

**■ वृत्तसंस्था, सोलापूर, दि. २४ :**

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात येऊ घातलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असून, भाजपविरोधात दोन्ही शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र आल्याने चर्चांना उधाण आले आहे. या घडामोडींवर राज्याचे मंत्री आणि भाजप नेते जयकुमार गोरे यांनी तीव्र शब्दांत प्रतिक्रिया देत विरोधकांवर निशाणा साधला आहे. बार्शीतील ही महाआघाडी नैसर्गिक नसून केवळ स्वतःचे राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी करण्यात आलेली तडजोड असल्याचा आरोप त्यांनी केला. भाजपच्या वाढत्या ताकदीपुढे विरोधक घाबरले असून, त्यामुळेच अनेक पक्ष एकत्र येताना दिसत असल्याचेही त्यांनी ठामपणे सांगितले.

जयकुमार गोरे यांनी भाजपच्या ताकदीवर भाष्य करताना सांगितले की, भाजप हा केवळ सोलापूर जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण राज्यातील सर्वात मोठा पक्ष आहे. आज अनेक राजकीय पक्षांना आपले अस्तित्व टिकवण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. अशा परिस्थितीत युती आणि आघाड्या हा पर्याय निवडला जात आहे. स्वतःच्या बळावर निवडणूक लढवण्याची क्षमता नसल्यामुळेच विरोधक एकत्र येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भाजप किती मजबूत आहे, हेच या घडामोडींमधून अधोरेखित होते, असा विश्वासही गोरे यांनी व्यक्त केला.

बार्शी तालुक्यात शिवसेना ठाकरे गट, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट भाजपविरोधात एकत्र आल्याच्या पार्श्वभूमीवर बोलताना जयकुमार गोरे यांनी महायुतीतील घटक पक्षांनाही सूचक इशारा दिला. स्थानिक पातळीवर आघाड्या करताना काही आचारसंहिता पाळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. महायुतीच्या बाहेर जाऊन निर्णय घेतले जात असतील, तर त्याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा, असे ते म्हणाले. बार्शीत ही युती नेमकी कशी झाली, कोणाच्या संमतीने झाली आणि याबाबत अधिकृत भूमिका काय आहे, हे संबंधित नेत्यांनाच विचारावे, असे म्हणत त्यांनी संजय राऊत यांच्यावरही अप्रत्यक्ष टोला लगावला.

दरम्यान, बार्शी तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक ही नेहमीच दोन प्रमुख राजकीय केंद्रबिंदूंभोवती फिरताना दिसते. आमदार दिलीप सोपल आणि भाजपचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्यातील ही लढत यंदाही केंद्रस्थानी असणार आहे. यंदाच्या निवडणुकीत दिलीप सोपल यांच्या नेतृत्वाखाली महाआघाडी उभी राहिली असून, त्यांना शिवसेना ठाकरे गट, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचा पाठिंबा आहे. या महाआघाडीची अधिकृत घोषणा दिलीप सोपल यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून केली

महासागर •रविवार,दि.२५ जानेवारी २०२६

अकोला पान ३

# रेल्वे स्थानकावर बदलाबाबतची माहिती डिस्प्लेवर द्यावी

▪अकोला,दि.२४ (प्रतिनिधी)▪

रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी त्यांची रेल्वे गाडी नेमकी कोणत्या फलाटावर लागेल या बाबतची माहिती डिस्प्लेवर दिल्या जाते. परंतु कधी कधी गाडीच्या थांब्यासाठी फलाट क्र. बदलविल्या जात असला तर या बदलाबाबत देखील माहिती प्रवाशांना द्यावी अशी अपेक्षा रेल्वे प्रवासी व्यक्त करत आहे.

दोन दिवसापुर्वीच जळगांव रेल्वे स्थानकावर फलाट क्र. ३ वर येत असलेली विशेष गाडी फलाट क्र. ६ वर लागणार असल्याची माहिती डिस्प्लेवर देण्यात आली नव्हती.

परिणामी फलाट क्र. ३ वर असलेल्या प्रवाशांना जेव्हा गाडीचा फलाट क्रमांक बदलला हे लक्षात आल्यानंतर त्यांचेवर धावपळीचा प्रसंग आला. फलाटातील हा बदल अगदी वेळेवर तर नक्कीच झाला नसणार त्यामुळे झालेला बदल हा अगोदरच डिस्प्लेवर दिला असता तर प्रवाशांची तारांबळ झाली नसती. रेल्वे स्थानकावर असलेल्या उद्घोषणा कक्षातुन केल्या जाणारी घोषणा ही सुस्पष्ट येत नसल्यामुळे देखील गोंधळ उडतो. त्यामुळे प्रवाशांना विशेषकर वयोवृध्दांना ऐकायला येईल अशा स्पष्ट भाषेत उद्घोषणा करावी अशीही प्रवाशांची मागणी आहे.

# राष्ट्रीय मतदार दिन आणि भारतीय नागरिकांचे कर्तव्य

**अकोला :** २५ जानेवारी हा दिवस भारतीय लोकशाहीच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचा आणि अभिमानाचा दिवस आहे. याच दिवशी, २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली.

स्वतंत्र भारताने लोकशाहीची वाट स्वीकारल्यानंतर, निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रिया राबविण्याची जबाबदारी या घटनात्मक संस्थेकडे सोपवण्यात आली. त्यामुळे भारतीय लोकशाहीत २५ जानेवारी या दिवसाला अतिशय महत्व आहे. तथापि, नागरिकांना आपल्या मताची किंमत, उपयोगिता, महत्व आणि कर्तव्य कळावे यासाठी २५ जानेवारी २०११ पासून हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा होतो. २०२६ हे वर्ष राष्ट्रीय मतदार दिनाचे १६ वे वर्ष आहे. निवडणूक आयोगाने यावर्षी राष्ट्रीय मतदार दिनाचे ब्रीद वाक्य 'म झा भारत माझे मत ' हे ठेवले आहे

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून ओळखला जातो. येथे कोट्यावधी मतदार आपला मतदानाचा हक्क बजावतात.

भारतीय लोकशाहीचा अभ्यास करण्यासाठी जगभरातून अभ्यासक, संशोधक आणि लोकशाहीप्रेमी भारतात येतात. यामागे भारतीय लोकशाहीची काही मूलभूत वैशिष्ट्ये आहेत. यामध्ये सार्वत्रिक प्रौढ मतदानाचा अधिकार, एक व्यक्ती-एक मत-एक मूल्य ही संकल्पना, धर्म, जात, लिंग, भाषा, आर्थिक स्थिती यांपलीकडे जाऊन दिलेला समान मतदानाचा हक्क, या वैशिष्ट्यांचा समावेश आहे.भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या संविधानात अनुच्छेद ३२६ नुसार प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदानाचा समान अधिकार बहाल करण्यात आला आहे. हा अधिकार केवळ मतदानापुरता मर्यादित नसून, तो देशाच्या भवितव्याचा निर्णय घेण्याचा अधिकार आहे. आपण निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या माध्यम ातून संविधानाची अंमलबजावणी होते, कायदे बनतात, धोरणे ठरतात आणि देशाची दिशा निश्चित होते. त्यामुळे मतदानाचा हक्क म्हणजे सामान्य नागरिकांच्या हातात दिलेले अत्यंत प्रभावी लोकशाही अस्त्र आहे.

# अकोला स्थानक स्वच्छतेत 'सुपरफास्ट'!

## 'विशिष्ट रेल सेवा' पुरस्कार सोहळ्यात पटकावली 'उत्कृष्ट स्वच्छ स्थानक' शिल्ड!

▪अकोला,दि.२४ (प्रतिनिधी)▪

मध्य रेल्वेच्या वतीने आयोजित ७० व्या 'विशिष्ट रेल सेवा पुरस्कार' सोहळ्यात अकोला स्थानकाने स्वच्छतेच्या ट्रॅकवर 'सुपरफास्ट' धाव घेत मानाची शिल्ड पटकावली आहे.मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे झालेल्या दिमाखदार सोहळ्यात अकोला स्थानकाचा गौरव करण्यात आला.




अकोला स्थानक स्वच्छतेत 'सुपरफास्ट'

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री. विवेक कुमार गुप्ता यांच्या हस्ते अकोला स्थानकाला 'उत्कृष्ट स्वच्छ स्थानक शिल्ड' प्रदान करण्यात आली. छडक्र-१ ते छडक्र-४ या महत्त्वाच्या श्रेणीतील स्थानकांमध्ये अकोल्याने स्वच्छतेचा उच्चांक प्रस्थापित केल्याबद्दल हा बहुमान मिळाला आहे.या यशाचे खरे मानकरी स्वास्थ्य निरीक्षक शिवकुमार माली यांनी अकोला स्थानक प्रबंधक संतोष कवडे यांच्या मार्गदर्शनाखाली घेतलेले परिश्रम ठरले आहेत. अकोला स्थानकाचे सर्व रेल्वे कर्मचारी, जीआरपी, आरपीएफ (मध्य रेल्वे) आणि आरपीएफ (दक्षिण मध्य रेल्वे) यांच्या सांघिक प्रयत्नां मुळे आणि अहोरात्र घेतलेल्या मेहनतीमुळेच अकोला स्थानक स्वच्छतेच्या बाबतीत आज संपूर्ण मध्य रेल्वेत 'सुपरफास्ट' ठरले आहे. अकोलेकरांसाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण आहे!अकोला ज्या भुसावळ विभागाचा भाग आहे, त्या विभागानेही या सोहळ्यात आपले वर्चस्व सिद्ध केले. भुसावळ विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री. पुनीत अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाने एकूण ६ स्वतंत्र शिल्ड आणि नागपूर विभागासोबत संयुक्तपणे 'समग्र दक्षता शिल्ड' पटकावली. भुसावळ विभागाने विद्युत, लेखा, कार्मिक, वैद्यकीय, भांडार आणि स्वच्छता या श्रेणींमध्ये यश मिळवले.

या भव्य सोहळ्यात रेल्वेच्या विविध कार्यांचे मूल्यमापन करण्यासाठी २० महत्त्वाच्या विभागांमध्ये शिल्ड प्रदान करण्यात आल्या. तसेच सोहळ्यात उत्कृष्ट कार्यासाठी ९८ रेल्वे अधिकारी व कर्मचाऱ्यांना वैयक्तिक 'विशिष्ट रेल सेवा पुरस्कार' देखील प्रदान करण्यात आले.

## नवनिर्वाचित नगराध्यक्षांचा सत्कार

**मूर्तिजापूर :** भारतीय मराठा महासंघ व मुर्तिजापूर तालुका मुख्याध्यापक संघाच्या वतीने व अरविंद कोकाटे व सचिव देवानंद मुसळे यांनी नवनिर्वाचित नगराध्यक्ष मा. हर्षलभाऊ साबळे यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

# वाघामुळे दहशतीचे वातावरण; वनविभागाने तत्काळ उपाययोजना कराव्यात : ज्ञानेश्वर मानकर यांची मागणी

▪अकोट,दि.२४ (प्रतिनिधी)▪

तालुक्यातील पिंप्री खुर्द, पिंप्री जैनपूर, बेलुरा, शहापूर, जितापूर तसेच परिसरातील अन्य गावांमध्ये वाघाचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतशिवारात व गावालगत वाघ दिसत असल्याच्या घटनांमुळे ग्रामस्थांमध्ये दहशत पसरली आहे.



या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर मानकर यांनी वनविभागाने तत्काळ पावले उचलावीत अशी मागणी केली आहे. वाघाच्या हालचालींमुळे शेतकरी, महिला व मजूर वर्गात भीतीचे वातावरण असून, जनावरांच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.वनविभागाने संबंधित परिसरात तातडीने गस्त वाढवावी, आवश्यक त्या ठिकाणी पिंजरे लावावेत तसेच नागरिकांना सतर्कतेच्या सूचना द्याव्यात, जेणेकरून कोणतीही अनुचित घटना घडणार नाही, अशी मागणी मानकर यांनी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन त्वरित कारवाई करावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

# राष्ट्रध्वजाचा अवमान रोखण्यासाठी हिंदु जनजागृती समितीचा एल्गार

## २६ जानेवारीला अकोला आणि मूर्तिजापुरात भव्य प्रदर्शनांचे आयोजन

▪मुर्तिजापुर,दि.२४ (प्रतिनिधी)▪

येत्या २६ जानेवारी रोजी साजरा होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर, राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्यासाठी आणि प्लास्टिकच्या ध्वजांमुळे होणारी विटंबना रोखण्यासाठी हिंदु जनजागृती समितीने जिल्हाभरात व्यापक मोहीम हाती घेतली आहे. राष्ट्रध्वज ही आपली अस्मिता असून उत्सवानंतर तो रस्त्यावर किंवा कचऱ्यात दिसणे हा क्रांतिकारकांच्या बलिदानाचा अपमान आहे, ही भावना जनमानसात रुजवण्यासाठी प्रशासनाला निवेदने देऊन जागृती करण्यात आली.प्रशासकीय निवेदने आणि जनजागृती:मूर्तीजापूर येथे समितीच्या कार्यकर्त्या कु.साक्षी श्रीराव,




कु. आकांक्षा हजारे, कु. दीक्षा अहिरवार आणि सौ. स्मिता महामुने यांनी माननीय तहसीलदार यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. तिरंग्याच्या रंगातील टी-शर्ट, मास्क आणि ऑनलाईन उत्पादनांच्या विक्रीवर बंदी घालण्याची मागणी यावेळी निवेदनातून करण्यात आली. अशा वस्तूंचा वापर हा 'राष्ट्रीय मानचिन्हांचा गैरवापर रोखणे कायदा १९५०' आणि 'राष्ट्र प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१' नुसार दंडनीय अपराध असल्याचे समितीने प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. याच धर्तीवर अकोला येथेही जिल्हा प्रशासन आणि पोलीस अधीक्षक यांना निवेदने देण्यात आली आहेत.केवळ कागदी किंवा प्लास्टिक ध्वज मिरवणे म्हणजे देशप्रेम नव्हे, तर त्या ध्वजाचे पावित्र्य जपणे हे महत्त्वाचे संस्कार विद्यार्थ्यांवर होणे आवश्यक आहे.

# आलेगाव येथून सागवानसह मशीन जप्त

**आलेगाव :** वनपरिक्षेत्र अंतर्गत आलेगाव गावामध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी पवन एस. जाधव यांना मिळालेल्या गुप्त माहितीवरून शेख कय्युम रा. आलेगाव यांचे घरी अवैधरीत्या सागवान कटाईचे व कटसाईज नग तयार करण्याची कामे सुरु असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार आलेगाव वनपरीक्षेत्राचे कर्मचारी यांनी २२ जानेवारी रोजी शेख कय्युम यांचे घरी धाड टाकली असता कटसाईज चिराण माल तसेच इलेक्ट्रिक रंदा मशीन, ग्राईडर, कटर ब्लेड व इतर संबंधित साहित्य अंदाजे किंमत १ लाख ३० हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला. आरोपी शेख कय्युम हा मोकास्थळी हजर नव्हता. त्याचा शोध घेतला असता सध्या फरार असल्याची माहिती मिळाली. आरोपीविरुद्ध भारतिय वन अधिनियम १९२७ अन्वये वनगुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीचा शोध घेणे सुरु आहे.

## थोडक्यात

### मुंबई-नागपूर विशेष रेल्वे धावणार

**अकोला :** प्रवासी गर्दी लक्षात घेता, मध्य रेल्वेने अतिरिक्त प्रवासी मागणी पूर्ण करण्यासाठी मुंबई - नागपूर दरम्यान विशेष गाडी चालवण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष गाडी २५ जानेवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ००.२० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १५.३० वाजता पोहोचेल. गाडी क्र. ०२१४० विशेष २५ जानेवारी रोजी नागपूर येथून २० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी १३.३० वाजता पोहोचेल. या गाडीला दादर, ठाणे, कल्याण, नाशिकरोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा येथे थांबा आहे. या गाडीला १ वातानुकूलित द्वितीय, ६ वातानुकूलित तृतीय, शयनयान, ४ सामान्य द्वितीय, १ सामान्य द्वितीय सह गार्डब्रेक व्हॅन आणि १ जनरेटर कार आहे.

### आरडीजी पब्लिक स्कूल येथे भव्य आनंदोत्सव साजरा

**अकोला :** आर. डी. जी. पब्लिक स्कूल येथे दिनांक २२ जानेवारी रोजी संध्याकाळी ५.००. वाजता स्कूलचे संचालक श्री दिलीपराजजी गोयनका, प्राचार्य कुरियचन सी. पी., उपप्राचार्या श्वेता चोमवाल यांच्या मार्गदर्शनात आनंदोत्सवाचे सुंदर आयोजन संपन्न झाले. सर्वप्रथम आर. डी. जी. पब्लिक स्कूलच्या संस्थापिका स्व. मधु मां यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण व अभिवादन करण्यात आले. या वेळी स्कूलचे संचालक दिलीपराजजी गोयनका यांनी आपले विचार व्यक्त करीत विद्यार्थ्यांना प्रेरणा देत त्यांचे मनोबल वाढविले व त्यांच्या या उपक्रमाची प्रशंसा केली. शाळेत दरवर्षी आनंदोत्सवाचे आयोजन केले जाते विद्यार्थ्यांना खरेदी विक्रीचे व्यवहार समजावेतसेच एकाच ठिकाणी विविध खाद्यपदार्थांची चव घेण्याची संधी भेटावी हे लक्षात घेता हे आयोजन करण्यात आले.

# नाकबंदी दरम्यान बेशिस्त वाहनचालकांकडुन ७९,७०० रू चा दंड वसुल

▪अकोला,दि.२४ (प्रतिनिधी)▪

जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, तसेच नागरिकांना सुरक्षित आणि शांततामय वातावरण मिळावे त्याकरीता मा. पोलीस अधिक्षक श्री अर्चित चांडक यांनी जिल्हयात आकस्मीक नाकाबंदी चे आयोजन करून सार्वजनीक ठिकाणी दारू पिणाऱ्या इसमांवर कडक कारवाईची मोहिम हाती घेतली आहे.सदर नाकाबंदी दरम्यान पोलिस विभागाच्या वतीने दिनांक २३.०१.२०२६ चे १८.०० वा ते २३.०० पावेतो आकस्मीक नाकाबंदीचे आयोजन करून तसेच विशेष पथके तयार करून सार्वजनीक ठिकाणी दारू पिउन गोंधळ घालणे, शांतता भंग करणाऱ्या व कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या ९० इसमांवर मुंबई पोलीस अधिनियम अंतर्गत कार्यवाही करण्यात आली. तसेच संपुर्ण जिल्हयात नाकाबंदी राबवुन, नाकाबंदी दरम्यान जिल्हयातील एकुण ४१ नाकाबंदी पॉईट वर १०८७ वाहने चेक करून मोटार वाहन कायदयान्वये १६७ कारवाई करून ७९,७००/- रू चा दंड आकरण्यात आला आहे. नाकाबंदी दरम्यान सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी नाकाबंदीच्या ठिकाणी भेटी दिल्या तसेच सर्व ठाणे प्रभारी अधिकारी



यांनी नाकाबंदी मध्ये सक्रीय सहभाग घेवुन प्रभावी नाकबंदी करण्यात आली आहे.

अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांपासून नागरीकांनी दूर राहावे आणि कोणतीही अनुचित घटना घडल्यास तत्काळ पोलीस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. अकोला पोलिसांकडून अशा प्रकारचे विविध प्रतिबंधक उपयोजना अधिक तीव्रतेने राबवुन, कायदा मोडणाऱ्यांवर कोणतीही सहानुभूती दाखवली जाणार नाही. करीता सर्व नागरिकांनी कायद्याचे पालन करावे आणि शहराच्या शांततेत योगदान द्यावे व नागरिकांच्या सहकाऱ्यानेच शहरात शांतता व सुव्यवस्था राखली जाऊ शकते, असे आवाहन मा. पोलीस अधीक्षक, अकोला यांनी केले आहे.

# सखारामपूर येथे श्री संत सखाराम महाराजांचा ७९ वा पुण्यतिथी सोहळा उत्साहात संपन्न

▪अकोला,दि.२४ (प्रतिनिधी)▪

संग्रामपूर तालुक्यातील सखारामपूर येथे संत सखाराम महाराजांचा ७९ वा पुण्यतिथी सोहळा भक्तीमय व उत्साही वातावरणात मोठ्या जल्लोषात पार पडला. तीन दिवसाच्या यात्रेमध्ये कोणत्याही प्रकारचा तमाशा आर्केस्ट्रा सिनेमा टॉकीज येथे आढळणार नाही या यात्रेचे विशेष आकर्षण म्हणजे वारकरी संप्रदायाच्या तब्बल २००१ हून अधिक दिंड्यांचा सहभाग होता.२२ तारखेला विविध भागांतून वारकरी आपल्या दिंड्या घेऊन सखारामपूर येथे दाखल झाले. २३ तारखेला मुख्य यात्रा उत्साहात पार पडली. तर २४ तारखेला काल्याच्या किर्तनानंतर वारकरी आपापल्या दिंड्यांसह आपल्या गावांकडे परतीच्या प्रवासाला निघाले.सखारामपूर संस्थानाला ङ्गवराळाची काशीङ्घ म्हणून ओळखले जाते. या ठिकाणी बहुजन समाजातील वारकरी ेमोठ्या संख्येने एकत्र येत असून तीन दिवस विविध धार्मिक, सांप्रदायिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संत सखाराम महाराजांनी आपल्या कीर्तनातून व आध्यात्मिक विचारांतून समाज प्रबोधनाचे



मोठे कार्य केले. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त सखारामपूर येथे हरीनामाचा भव्य सोहळा अनुभवायला मिळतो.या संस्थानाची गादी सांभाळणारे गुरुवर्य ह.भ.प. तुकाराम म हाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानाचा कारभार मोठ्या प्रमाणात विस्तारला आहे. तसेच अनेक वर्षांपासून होत असलेल्या या यात्रा महोत्सवासाठी गुरुवर्य गोपाळ महाराज व गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांचे मोलाचे योगदान लाभले आहे. २४ तारखेला गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने यात्रा महोत्सवाची सांगता झाली.

# बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक : गिरीश गोखले

## सातव चौक, जठारपेठ येथे जयंतीनिमित्त राजकीय एकोप्याचे दर्शन

▪अकोला,दि.२४ (प्रतिनिधी)▪

बाळासाहेब ठाकरे हे केवळ एखाद्या राजकीय पक्षाचे नेते नव्हते, तर ते संपूर्ण महाराष्ट्राच्या अस्मितेचे, स्वाभिमाना चे आणि मराठी माणसाच्या निर्भीड आवाजाचे प्रतीक होते.

त्यांच्या विचारांनीच अनेक पिढ्यांना दिशा दिली असे प्रतिपादन भाजप नेते गिरीश गोखले यांनी केले. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त सातव चौक, जठारपेठ येथे मनसे, शिवसेना व भाजपच्या कार्यकर्त्यांनी संयुक्तपणे जयंती कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमातून राजकीय पक्षभेद बाजूला ठेवून सामाजिक ऐक्य व एकोप्याचे दर्शन घडले. गिरीश गोखले यांनी आपल्या भाषणात बाळासाहेबांच्या विचारांची आजच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीत असलेली उपयुक्तता अधोरेखित केली.










ङ्गमराठी माणसाचा स्वाभिमान जागवणे, अन्यायाविरुद्ध निर्भीडपणे उभे राहणे आणि समाजहिताला प्राधान्य देणे, हीच बाळासाहेबांची खरी शिकवण आहे, असे ते म्हणाले.

प्रारंभी बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिम ेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी 'बाळासाहेब अमर रहें' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. कार्यक्रमास परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती.

या जयंती सोहळ्यात विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते एकत्र आले होते. मनसे, शिवसेना व भाजप या तिन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी पक्षभेद विसरून बाळासाहेबांच्या विचारांना अभिवादन केले. या एकत्र येण्यामुळे परिसरात सकारात्मक संदेश गेला असून, सामाजिक सलोखा व परस्पर सौहार्द जपण्याची भावना अधिक दृढ झाल्याचे नागरिकांनी सांगितले.उपस्थित मान्यवरांनीही बाळासाहेब ठाकरे यांच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय योगदानावर प्रकाश टाकला.

मराठी भाषेचा सन्मान, मराठी माणसाचे हक्क, तसेच अन्यायाविरुद्धचा ठाम आवाज हे बाळासाहेबां च्या कार्याचे प्रमुख वैशिष्ट्य असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

# विश्वभारती केंद्राची नव्याने सुरुवात




▪अकोला,दि.२४ (प्रतिनिधी)▪

भौगोलिक तथा खगोलीय माहिती प्रत्यक्षात विविध प्रकारच्या प्रतिकृतींद्वारा विद्यार्थी, शिक्षक आणि आकाश प्रेमिंसाठी अकोला वाशिम राष्ट्रीय महामार्गावर भंडारज फाट्याच्या जवळ विश्वभारती केंद्र नव्या रुपात सज्ज होत आहे.

भूगोल, खगोल, पर्यावरण तसेच विविध विषयांची अधिक गोडी आणि आवड निर्माण करण्यासाठी व या अवघड विषयातील विविध संकल्पना व संबोध अधिक स्पष्ट आणि सहज लक्षात येण्यासाठी हे केंद्र अनेक वर्षापासून कार्यरत आहे.अभ्यास पूरक व प्रेरक उपक्रम येत्या २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनापासून सर्व सामान्य जनतेच्या सेवेसाठी खुले होत आहे.दर शनिवारी व रविवारी किंवा आपल्या सोयीनुसार मधल्या दिवशी प्रत्यक्ष आकाश दर्शन, दूर्बीणीतून ग्रहांचे निरिक्षण व आकाश कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल.

महासागर
# अकोला
पान ६
●रविवार,दि.२५ जानेवारी २०२६

## अकोट तालुक्यात कापूस वेचणी यंत्राचे यशस्वी प्रात्यक्षिक,'विजेता' वाणाला शेतकऱ्यांची मोठी पसंती

▪अकोट,दि.२४ (प्रतिनिधी)▪

कापूस शेतीमध्ये मजुरांची टंचाई आणि वाढता खर्च लक्षात घेता,शेतीमध्ये यांत्रिकीकरणाचा वापर काळाची गरज बनली आहे.याच अनुषंगाने नुझिवीडू सीड्स लिमिटेड आणि न्यू हॉलंड कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने अकोट तालुक्यातील कालवडी येथील शेतकरी अरुण हिंगणकर यांच्या शेतात कापूस वेचणी यंत्राचे (Mechanised Picking) भव्य प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते.या प्रयोगासाठी नुझिवीडू सीड्सच्या 'विजेता NCS ८५८' या वाणाची निवड करण्यात आली होती.प्रमुख पाहुणे आणि मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमाला कृषी क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवरांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. यामध्ये कुलदीप देशमुख (विषय विशेषज्ञ,कृषी विज्ञान केंद्र अकोला)डॉ. नवीनचंद्र विजय कायंदे(सहाय्यक प्राध्यापक कृषी वनस्पतीशास्त्र विभाग,डॉ. प.दे.कृ. वि.अकोला)डॉ.संजय काकडे (सहयोगी प्राध्यापक,डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ)डॉ.अजित वासेकर (कृषी विभाग, महाराष्ट्र शासन व त्यांची चमू)बी.बी.गावंडे (माजी महाव्यवस्थापक,नुझिवीडू सीड्स)यावेळी मान्यवरांनी 'विजेता' वाण यांत्रिकीकरणासाठी कसे उपयुक्त आहे.यावर सविस्तर चर्चा केली.२५० हून अधिक शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद या कार्यक्रमाला परिसरातील सुमारे २५० हून अधिक प्रगतिशील शेतकऱ्यांनी उपस्थिती



लावली.यामध्ये प्रगतशील शेतकरी जगण बगाडे आणि दिलीप ठाकरे (HDPS शेतकरी) यांसारख्या अनुभवी शेतकऱ्यांनीही या तंत्रज्ञानाचे निरीक्षण केले.

अकोट येथील झांबरे पाटील (झांबरे कृषी सेवा केंद्र अकोट) यांनीही यावेळी उपस्थित राहून वितरक म्हणून मोलाची भूमिका बजावली.नुझिवीडू टीमचे विशेष योगदान हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नुझिवीडू सीड्सच्या प्रॉडक्ट डेव्हलपमेंट आणि सेल्स टीमने विशेष परिश्रम घेतले.यामध्ये कंपनीचे खालील अधिकारी उपस्थित होते.संदीप माळी (इंडिया प्रॉडक्ट डेव्हलपमेंट हेड) आणि प्रवीण दुरतकर (महाराष्ट्र हेड,प्रॉडक्ट डेव्हलपमेंट) यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक बाबींचे सादरीकरण करण्यात आले. व्यवस्थापनामध्ये सुग्रीव पवार (झोनल मॅनेजर)विक्रम मिसळ (झोनल सेल्स इनेबलमेंट मॅनेजर)वैभव जाधव (रीजनल मॅनेजर)अजय तरडे (कउ्झड मॅनेजर) आणि तुषार धोटे (टेरिटरी मॅनेजर) यांचा सक्रिय सहभाग होता.

'विजेता NCS ८५८' ची वैशिष्ट्येयंत्राद्वारे कापूस वेचणी करताना झाडाची रचना आणि बोंडाची पकड महत्त्वाची असते.नुझिवीडूचे 'विजेता' वाण या निकषांवर अत्यंत यशस्वी ठरल्याचे प्रात्यक्षिकादरम्यान दिसून आले.या तंत्रज्ञाना मुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## 'अनेकता में एकता यही है भारत देश की महानता'चा संदेश देत युवाशक्तीच्या रॅलीने वेधले लक्ष

▪अकोला,दि.२४ (प्रतिनिधी)▪

अनेकता में एकता यही हे भारत देश की महानता' हाच आपल्या लौकिक अतिशय गौरवाने आणि अभिमानाने प्रदर्शित करणारी सोबतच आपल्या देशाची वैचारिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक, वैज्ञानिक परंपरा अधोरेखित करणारी सर्वार्थाने उत्साहवर्धक, समाजाला सुस्पस्ट संदेश देणारी तब्बल १६०० पेक्षा जास्त युवा शक्तीचा समावेश असलेली रॅलीने आज अकोला शहरातील आसमंत आपल्या देश भक्तीपर संदेशानी, सादरीकरणांनी दणाणून टाकत अकोलेकरांचे लक्ष वेधले व मा. राजपाल महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून निर्मित आव्हान या चान्सलर्स ब्रिगेडचे एक प्रकारे शक्ती प्रदर्शनच केले. आपल्या रंग बिरंगी वेशभूषाणी तसेच सादरीकरणांनी संपन्न झालेली रॅली आपला हेतू सफल करून गेली. सकाळी १० वाजता सुरु झालेली हि रॅली मिराज सिनेमा, नेहरू



पार्क, अशोक वाटिका, पोस्ट ऑफिस चौक मार्गे आर एल टी कॉलेज समोरून सिव्हिल लाईन चौकातून सिव्हिल लाईन पोलीस स्टेशन समोरून परत नेहरू पार्क चौकातुन महाबीज मार्गे कृषि महाविद्यालयाच्या प्रांगणात सांगता झाली.दरम्यान आज सकाळी विद्यापीठाच्या कृषि महाविद्यालय परिसरात सहभागी प्रत्येक महाविद्यालयाने तज्ञब समिती समोर आपले सांस्कृतिक सादरीकरण केले. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, अकोला जिल्हा प्रमुख सत्र न्यायाधीश श्री. शिवाजीराव कचरे, विद्यापीठातील सर्व संचालक, अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता, कुलसचिव आदींची उपस्थिती होती.

## मूर्तिजापुरात पथविक्रेत्यांना मिळणार क्रेडिट कार्ड; २५ लाभार्थ्यांना कर्जवाटप

▪मुर्तिजापुर,दि.२४ (प्रतिनिधी)▪

प्रधानमंत्री स्वनिधी योजनेंतर्गत देशभरात कर्ज व क्रेडिटकार्ड वितरणाचा शुभारंभ करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिरुअनंतपुरम (केरळ) येथून लाइव्ह कार्यक्रमाद्वारे देशातील पथविक्रेत्यांना संबोधित केले. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण नगर परिषद मूर्तिजापूर येथे २३ जानेवारी रोजी करण्यात आले.गृह निर्माण व शहरी कार्य मंत्रालयाच्या निर्देशानुसार नगर परिषद मूर्तिजापूरच्या वतीने न.पा. सभागृहा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मुख्याधिकारी निलेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात नगराध्यक्ष हर्षल साबळे व उपाध्यक्ष रोहित अव्वलवार यांच्या हस्ते २५ लाभार्थ्यांना दुसरा व तिसरा टप्प्यातील अनुक्रमे २५ हजार व ५० हजार रुपयांचे कर्ज

वितरण करण्यात आले. तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया मूर्तिजापूरचे व्यवस्थापक प्रशांत माने यांच्या हस्ते योगेश वानखडे या पथविक्रेत्यास क्रेडिट कार्ड मंजुरी पत्र देण्यात आले. यावेळी सहाय्यक प्रकल्प अधिकारी राजेश भुगुल यांनी माहिती देताना सांगितले की, आजपर्यंत ८५९ पथविक्रेत्यांना स्वनिधी योजनेंतर्गत २ कोटी १४ लाख रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले आहे.

## विद्याभारती तर्फे सप्तशक्ती संगम कार्यक्रम संपन्न



▪अकोला,दि.२४ (प्रतिनिधी)▪

अकोल्यातील विद्याभारती संलग्नित बी आर हायस्कूल व अहिल्यादेवी इंग्लिश प्रायमरी स्कूल येथे २३ जानेवारी रोजी सप्तशक्ती कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान मुख्यध्यापिका नंदिनी मायी यांनी भूषविले तसेच प्रमुख वक्ता म्हणून ऐश्वर्याताई धारस्कर यांनी कुटुंब प्रबोधन ह्या विषयावर उपस्थित महिला पालकांशी हितगुज साधले. आपल्या भाषणात ऐश्वर्याताई यांनी स्त्री मध्ये असलेल्या सप्तशक्ती आणि हिंदू धर्माचा आधार असलेले चार आश्रम या विषयी भाष्य करत छोटे छोटे उदाहरण देत सुरेखरित्या विषयाची सांगड घातली. तसेच स्त्री ही कुटूंबाचा कणा असून, कुटुंबाला एकसंध ठेऊन कुटुंबातील मोठ्यांना आधार व मुलांमध्ये संस्कार व राष्ट्रभक्ती रुजावणारी एक अत्यंत महत्वाची सदस्य आहे असे नमूद केले.

यावेळी समाजात एक वेगळे कार्य करणाऱ्या मातांचा सत्कार करण्यात आला.

## पारस येथे मराठा पाटील समाज संवाद पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

▪अकोला,दि.२४ (प्रतिनिधी)▪

मराठा पाटील संघ, बाळापूर यांच्या वतीने आयोजित समाज संवाद पदयात्रेचे पारस येथे आगमन होताच संपूर्ण गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. ढोल-ताशांच्या गजरात, रस्त्यावर रेखाटलेल्या रंगीबेरंगी रांगोळ्यांतून आणि महिलांनी केलेल्या औक्षणातून पदयात्रेचे पारंपरिक व संस्कारशील स्वागत करण्यात आले. ङ्गजय जिजाऊ, जय शिवरायङ्ग या घोषणांनी पारस गाव दुमदुमून गेले होते.पदयात्रा पाराशर मंदिर संस्थान येथे पोहोचल्यानंतर रॅलीचे रूपांतर जाहीर सभेत झाले. या सभेत समाजातील अनिष्ट प्रथा, अंधश्रद्धा, खर्चिक विवाह पद्धती व शेतीतील वाढता खर्च यावर चिंतन मंथन करत समाजबांधवांना दिशादर्शक मार्गदर्शन करण्यात आले. समाजातील एकजूट, स्वावलंबन, विचारशीलता आणि परिवर्तनाची गरज यावर वक्त्यांनी प्रभावीपणे प्रकाश टाकला.या कार्यक्रमाला मराठा पाटील संघटनेचे अध्यक्ष शरद




वानखडे, जेष्ठ नागरिक सहदेवराव पाटील, रामदास पाटील, दादाराव लांडे,वसंतराव पोहरे हिम्मतराव मेटांगे धनंजय नेमाडे मोहन सरप गजानन हरणे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अशोक अमानकर यांच्यासह देवानंद साबळे, मधुसूदन माळी, रुपेश पटोकार, गणेश मुरूमकर, मधुसूदन टिकार, मोहन सरफ, सहदेवराव लांडे, रामदासजी लांडे, मधुकर लांडे, कालीन लांडे, शिवदीप लांडे, बिपिन लांडे आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते.

## अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ जिल्हा उपाध्यक्ष पदी दिपक जोशी



▪तेल्हारा, दि..२४ (प्रतिनिधी)▪

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ अकोला जिल्हा कार्यकारिणीचे गठन व पदग्रहण समारंभ अभिरूची गार्डन येथे नुकतेच संपन्न झाले.यावेळी तेल्हारा शहरातील दिपक जोशी यांची अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ जिल्हा उपाध्यक्ष तर डॉ विक्रम जोशी यांची चिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली या नियुक्तीचे तेल्हारा सर्व शाखीय ब्राह्मण संघाच्या वतिने दोघांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन गजानन मुंजे, ताराचंद पालिवाल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी प्रराग शुक्ला,शरद शुक्ला,प्रविण चिंचाळे, सुयोग बिडवई, प्रद्युम्न जोशी,नथमल छांगाणी,आदित्य जोशी,संजय झिरमिरे,प्रराग कुलकर्णी महेंद्र देशपांडे,ओझाजी,जितेंद्र छांगाणी,जितेंद्र पालिवाल, महेश जोशी,दिपक छांगाणी,दिपक वैष्णव,अनिल जोशी,प्रेम दुबे,ॲड. सागर शर्मा,लखन पालिवाल प्रथमेश भालेराव रवि शर्मा यांची उपस्थिती होती.

## पातूर येथे नानासाहेब यात्रा महोत्सवाचे आयोजन

**पातूर :** पातूरचे ग्रामदैवत श्री. नानासाहेब महाराज देवस्थानच्यावतीने प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही यात्रा महोत्सव होत असून यात्रा महोत्सवाच्या पूर्व तयारीसाठी श्री. नानासाहेब चॅरिटेबल ट्रस्ट व सर्व गावकरी मंडळी परिश्रम घेत

आहेत.पातूरचे ग्रामदैवत श्री. नानासाहेब महाराज यात्रा महोत्सवाचे आयोजन प्रतिवर्षी उत्साहात करण्यात येते. या यात्रा महोत्सवाचे केवळ पातूर शहरातच नव्हे तर संपूर्ण तालुक्यात मोठे आकर्षण आहे. या यात्रेस भाविकांसह नागरिकांची मोठी गर्दी असते. हा यात्रा महोत्सव यावर्षी दिनांक २८ जानेवारी २०२६ बुधवार रोजी होणार आहे.

## तिवसा बु गावाची जिल्हास्तरीय समितीकडून पाहणी

▪बार्शिटाकळी,दि.२४ (प्रतिनिधी)▪

तालुक्यातील तिवसा बु. ग्रामपंचायतची संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत २२ /१/ २६ रोजी गावाची पाहणी व रेकॉर्ड तपासणी करण्यात आली ग्रामपंचायत तिवसा आयुष्यमान आरोग्य मंदिर,जि. प. शाळा, अंगणवाडी येथे भेट देऊन रेकॉर्ड पाहणी केली व संपूर्ण गावाची स्वच्छता पाहणी वरिष्ठ अधिकार्यांमार्फत करण्यात आली संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान कार्यक्रमांमध्ये ग्राम तीवसा येथील ग्रामपंचायत सरपंच श्रीमती मंदाताई भारत बहादरे व ग्रामपंचायत सर्व सदस्य सर्व ग्रामस्थ आयुष्यमान आरोग्य मंदिर कर्मचारी शाळेमधील शिक्षक वृंद व अंगणवाडी कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

संपूर्ण गावाची स्वच्छता व मान्यवरांचे स्वागत करण्याकरिता तिवसा. येथील गावकरी हे काम करता कुठेही बाहेर न जाता घरी थांबून मान्यवर टीमचे स्वागत केले २०२५ ला ग्राम तिवसा यांनी संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत सहभाग घेऊन गावाला तिसरा क्रमांक मिळवून दिला होता यावर्षी सुद्धा मंदाताई भारत बहादरे सरपंच यांनी व ग्रामस्थ सर्व यांनी मिळून या योजनेमध्ये सहभाग घ्यायचा अशे ठरविले व दिनांक २२/ १/ २६ रोजी गावाची प्रगती



पाहण्याकरिता या कार्यक्रमांतर्गत पाहणी झाली फळा फुलांनी भरलेली रोडला लागून असलेली स्मशानभूमी गावाच्या कडेला असलेले रस्ता रुंदीकरण पाणी आडवा पाणी जिरवाअंतर्गत गावांमध्ये केलेले शोषखड्डे गुरांना पिण्याकरता गावाच्या दोन्ही बाजूला असलेले पाण्याचे हौद व २४ तास पाणी उपलब्ध गावाच्या दोन्ही बाजूला घनदाट वृक्ष लागवड व वृक्ष रंगरंगोटी गावातील एकीचे बळ सर्व कार्यालयांचे रेकॉर्ड पाहणी करण्यात आली पाहणी दरम्यान माननीय गटविकास अधिकारी बार्शीटाकळी मिलिंद मोरे बाबुलाल राठोड शिक्षण विभाग, श्रीमती वैशाली बोदडे ग्रामस्थ व ग्राम स्तरावरील कर्मचारी यांचे लक्ष आता पाहणीच्या निकषाची आतुरता लागली आहे.

## आसक्ती हा परमार्थातील खोळंबा :हभप प्रदीप महाराज पडोळे

▪अकोला,दि.२४ (प्रतिनिधी)▪

संसारातील विषयासक्त विनीयोगामुळे खरा परमार्थ होऊ शकत नाही. शाश्वत व दैवी जीवनासाठी विषय हा मारक तर परमार्थ हा तारक असतो. परमार्थाच्या मार्गावरून चालण्याने भगवंत प्राप्ती होत असते. या मार्गावरूनच सर्व संतांनी चालून भगवंताचा कृपाप्रसाद प्राप्त केला आहे.अशा पराकोटीच्या मार्गाचे सर्वांनी अनुसरण करून जीवनात येण्याचा खरा उद्देश सफल करावा असा हितोपदेश हभप प्रदिप महाराज पडोळे यांनी दिला.स्थानीय फडके नगर येथील हनुमान मंदिर येथे सुरू असलेल्या संगीतमय रामायण व कीर्तन उत्सवात कीर्तनाचे पंचम पुष्प मोर्शी येथील कीर्तनकार हभप प्रदिप महाराज पडोळे यांनी गुंफले.संत तुकोबारायांच्या अभंगावर त्यांनी आपले संगीतमय कीर्तन सादर केले. ते म्हणाले, संसाररुपी रसात शब्द,स्पर्श, रूप, रस,गंध हे विषयाचे रस विराजमान आहेत. या रसाने मनुष्य आपला विवेक व सद्विवेक बुद्धी गमावून बसतो. त्याला परमार्थ कोणत्याही परिस्थितीत साधता येत नाही. कोणत्याही रसाने भगवंताची अनुकृपा प्राप्त होऊ शकत नाही.मात्र तुकोबारायां च्या उक्तीप्रमाणे ब्रह्मरस पिल्याने सत्संगाची ओढ अंगी निमर्ण होऊन भगवंताची प्राप्ती होते. म्हणून सत्संगरुपी ब्रह्मरस सातत्याने पिणे गरजेचे



असल्याचे त्यांनी सांगितले. या रसाची फोड करताना ते म्हणाले ब्रह्मरस हे दुसरे तिसरे काही नसून सत्संगाचे विचार अंगी बाळगून त्याप्रमाणे मार्गक्रमण करणे, भगवंताची नित्य आराधना व नामस्मरण करणे म्हणजे,पुराणे भागवत आदींचे मनन चिंतन म्हणून ब्रह्मरस पिणे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. ज्याप्रमाणे गोमाता आदी प्राणी चारा खाऊन झाल्यावर रवथ करीत बसतात. त्याच प्रमाणे सत्संगाचे ज्ञान प्राप्त करून त्या ज्ञानाचे चिंतन करणे म्हणजे रवंथ करणे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सर्वप्रथम हभप प्रदीप महाराज यांचे समितीच्या वतीने स्वागत करण्यात आले. संचालन खरपकर गुरुजी,मेजर बुडूकले यांनी केले.आज दुपारी ३ वाजता उत्सवाची ग्रंथ दिंडी शोभायात्रा दाबकी रोड परिसरात आयोजित करण्यात आली आहे.उद्या सोमवार दिनांक २६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता हभप तुकाराम महाराज सखाराम पुरकर इलोरा यांचे काल्याचे किर्तन होऊन या संगीतमय रामायण व किर्तन महोत्सवाची सांगता होणार आहे.पंचक्रोशीतील महिला पुरुष भक्तांनी या संगीतमय रामायण व किर्तन उत्सवाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन मेजर रामरतन बुळूकले,हरिभाऊ चितोळे,मनोहर खरपकार,रमेश खोटरे, नारायणराव गावंडे,प्रकाश चौधरी,मनोज गायकवाड,संतोष घोगरे,बाबूलाल चौधरी, प्रभू इंगळे,लता बुळूकले, आशा खरपकार, अनुराधा घोगरे सहभागी झाले होते.

'मुला-मुलींचे विवाह जुळवण्यासाठी मध्यस्थी मंडळाने राबवलेले उपक्रम हे निष्काम सेवेचा एक आदर्श आहे. काळाची गरज ओळखून या मंडळाने तयार केलेली 'विवाह आचारसंहिता' समाजाला नवी दिशा देणारी ठरेल,'

### निधन वार्ता

**सौ पार्वतीबाई लक्ष्मण दामधर**



२४/०१/२०२६ ला सायंकाळी ६-०० वाजता देवाज्ञा झाली. त्यांची अंतयात्रा उद्या दि २५/०१/२०२६ सकाळी १०-०० वाजता त्यांचे राहते गुलमोहर कॉलनी येथून अकोट रोड हिवरखेड येथील स्मशानभूमीत जाईल.

## कृतियुक्त पर्यावरण संवर्धना सोबतच आदर्श नागरी कर्तव्याचा पुरस्कार काळाची गरज : अंबरीश पुंडलिक

▪अकोला,दि.२४ (प्रतिनिधी)▪

ऋषीं आणि कृषि संस्कृतीचा अनोखा संगम असलेला सर्वाधिक युवकांचा आपला भारत देश सर्वार्थाने आत्मनिर्भरते सोबतच विश्वगुरु म्हणून जागतिक पटलावर अग्रेसीत होताना हवामान बदलासोबतच सामाजिक विषमतेच्या प्राथमिक स्तरावरील समस्यां अतिशय गांभीर्याने हाताळत असल्याचे प्रतिपादन आधुनिक राजकीय व्यवस्थेचे अभ्यासक इंजि. अंबरीश पुंडलिक यांनी केले. राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रम 'आव्हान-चान्सलर्स ब्रिगेड २०२५-२६ ' अंतर्गत डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात आयोजित विशेष मार्गदर्शन कार्यक्रमात तज्ञ व्याख्याता म्हणून उपस्थित राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. सर्वाधिक प्राचीन ऋषी व कृषी संस्कृती लाभलेल्या आपल्या देशाने अनेकानेकलौकिक प्रस्थापित केले असून कधीकाळी अन्नधान्यासाठी इतर प्रगत राष्ट्रांवर अवलंबून असलेल्या आपल्या देशाने कृषी वैज्ञानिकांच्या अथक परिश्रमातून परिपूर्णता आणत आज आत्मनिर्भरता साध्य केली असून विदेशी चलन प्राप्तीसाठी शाश्वत स्त्रोत म्हणून पुढे येत आले आहे ही अतिशय सन्मानाची बाब आहे असे सांगताना अंबरीश पुंडलिक यांनी देशांतर्गत वास्तविक परिस्थितीला सुद्धा हात घालत सभागृहाला धीर गंभीर केले. जागतिक हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत कार्बन उत्सर्जन कमी करणे साठी वृक्ष लागवडीसह संवर्धन व एक सुजाण नागरिक म्हणून देशाच्या संस्कृतीला आधारस्तंभ मानत स्व, कुटुंब, समाज, पर्यावरण, समता/ समरसता या पंचतत्वांचे पालन करीत संपूर्ण भारतीय एकाच छताखालील असल्याचे जगाला दाखवून द्यावे असे भावनिक आवाहनही केले. नागरी कर्तव्य साधे साधे नियम पाळून सुद्धा पालन होऊ शकतात जसे की ट्रॅफिक सिग्नल पाळणे, लाच देणार नाही, रॉंग साइड जाणार नाही. पर्यावरण चे रक्षण करणे आवश्यक आहे . नदीचे किराणा स्वच्छ ठेवणे, जिथे मनुष्य घेऊन पोहोचला नाही तर ती नदी खूप चांगली आहे याचे कारण शोधणे आवश्यक आहे. प्लास्टिक वापर पूर्णपणे बंद करणे आवश्यक आहे पण स्वतःपासून कृतीस करणे आवश्यक आहे. कापडी पिशवी वापरावे असे राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या गळी उतरविण्यात पुंडलिक यशस्वी झाले. विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संदीप हाडोळे यांचे अध्यक्षतेत संपन्न झालेल्या या विशेष व्याख्यानाचे प्रसंगी बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सोमीनाथ खाडे, अकोला येथील सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र देशपांडे आदीची विचार मंचावर विशेष उपस्थिती होती.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak, **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मिला स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, **समूह संपादक :** संदीप रामराव काळे, **प्रबंध संपादक :** पंकज श्रीकृष्ण चांडक **स्थानिक संपादक :** *पुरुषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)

महाराष्ट्रनामा

# एमआयएमची महाराष्ट्रात मुसंडी



सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@ gmail.com

महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकांमधे एआयएमआयएम पक्षाचे १२६ नगरसेवक निवडून आल्याने सर्वच राजकीय पक्षांना धक्का बसला आहे. मुस्लिम व्होट बँकेच्या जोरावर या पक्षाने मिळालेल्या यशामुळे काँग्रेस, सपा, राष्ट्रवादी काँग्रेस अशा पक्षांना मुस्लिम मतदारांनी इशारा घंटा दिली आहे. धर्मनिरपेक्ष पक्ष असा बँड वाजवत हे पक्ष मुस्लिम मतदारांना वर्षानुवर्षे आकर्षित करीत आहेत पण नंतर त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते, हीच भावना मुस्लिम समाजात बळावली आहे. मुस्लिम मतदारांनी मोठ्या प्रमाणावर एमआयएमला मतदान केले, हे निकालानंतरच उघड झाले.

महाराष्ट्रात चार-पाच मोठे राजकीय पक्ष आघाडी किंवा युती करून एकमेकांच्या विरोधात लढत असतात. प्रकाश आंबेडकर किंवा रामदास आठवले यांच्या पक्षाला युती किंवा आघाडीला बरोबर घ्यावे लागते. पण एमआयएमला बरोबर घेऊन लढावे अशी कोणाची हिम्मत झाली नव्हती. यावेळी अकोला जिल्हयातील अकोटमधे स्थानिक पातळीवर भाजपाने एमआयएमशी समझोता केला तेव्हा मोठा गहजब माजला. एमआयएम ही भाजपाची बी टीम आहे असा टीकेचा भडिमार विरोधी पक्षाने केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एमआयएमशी भाजपाने केलेला समझोता कदापि मान्य होणार नाही, असे जाहीर करावे लागले. महाराष्ट्रात अनेक राजकीय पक्ष असताना मुस्लिम मतदारांना दुसऱ्या राज्यातील एमआयएम हा पक्ष जवळचा का वाटावा ? महाराष्ट्रातील मुस्लिमांचा राज्यातील राजकीय पक्षांवर विश्वास राहिला नाही का ? गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत आणि यंदाच्या वर्षा झालेल्या महापालिका निवडणुकीत मुस्लिम मतदारांनी उद्धव ठाकरे यांच्या उबाठा सेनेला मतदान केले. ते काही ठाकरेंविषयी प्रेम म्हणून नव्हे. तर ठाकरे हे भाजपाच्या विरोधात कणखरपणे लढत आहेत म्हणून मुस्लिम मतदारांनी मशालीवर बटण दाबले. आता एमआयएम हा पक्ष त्यांना जवळचा वाटू लागल्यामुळे मुंबईमधे उद्धव ठाकरेंच्या पक्षाचे नुकसान होणार आहे.

ओवेसी यांनी सुरूवातीला महाराष्ट्रात मराठवाड्यात लक्ष्य केंद्रीत केले. छत्रपती संभाजीनगर व नांदेड वाघाळा महापालिकेत एमआयएमने प्रथम शिरकाव केला.यंदाच्या निवडणुकीत छत्रपती संभजीनगर महापालिकेत ३३ तर नांदेड वाघाळा महापालिकेत १४ नगरसेवक एमआयएमचे निवडून आले आहेत. छ. संभाजीनगरमधे शिवसेना व उबाठा सेनेपेक्षा जास्त नगरसेवक एमआयएमचे निवडून आले आहेत. मुंबईमधे ८, नागपूरमधे ६ तर ठाण्यात ५ नगरसेवक निवडून आणण्याची किमया एमआयएमने केली आहे. मुंबईमधे राज ठाकरेंच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे ६ नगरसेवक निवडून आले आहेत. मालेगावमधे २१, धुळ्यात १०, अमरावतीत १२, सोलापूर महापालिकेत ८ नगरसेवक एमआयएमचे निवडून आले आहेत. मुस्लिम मतदार कसा एकवटलेला आहे हे त्याचे चित्र आहे. एका रात्रीत किंवा मशिदीतून ऐनवेळी फतवा निघाला म्हणून एमआयएमला मुस्लिमांचे एक गठ्ठा मतदान झालेले नाही. महाराष्ट्रातील महापालिका निवडणकीची तयारी एमआयएमकडून अगोदरपासून चालू होती. निवडणुकीचे सूक्ष्म व्यवस्थापन करणाऱ्या भाजपालाही त्याची कुणकूण लागली नाही. सन १९९९ मधे एमआयएमने महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक लढवली होती. २०१२ साली नांदेड महापालिकेत एमआयएमचे ११ नगरसेवक निवडून आले. २०१७ मधे मात्र या पक्षाला खातेही उघडता आले नव्हते. २०१४ मधे मोदी लाटेत एमआयएमचे दोन आमदार महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले. २०१५ मधे औरंगाबाद महापालिकेवर या पक्षाचे २५ नगरसेवक निवडून आले. २०१२ मधे महाराष्ट्रात नोंदणीकृत पक्ष म्हणून निवडणूक आयोगाकडे एमआयएमची नोंद झाली. २०१९ मधे इम्तियाज जलिल हे औरंगाबाद लोकसभा मतदारसंघातून एमआयएमचे खासदार म्हणून निवडून आले. वर्षानुवर्षे मुस्लिम मतदार काँग्रेसला मतदान करीत होता. मुंबईतील मुस्लिमांची वस्ती मोठ्या संख्येने असलेल्या प्रभागातून काँग्रेसचे उमेदवार म्हणून मुस्लिम नगरसेवक महापालिकेत निवडून येत असत. नबाब मलिक आणि अबू आजमी यासारखे नेते मुस्लिम मतदारांना आपल्या पक्षाकडे आकर्षित करीत असत. मलिक हे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे मुंबईचे अध्यक्ष आहेत तर आजमी हे मुंबईतील सपाचे मोठे नेते आहेत. यंदाच्या निवडणुकीत मुंबई व महाराष्ट्रातील मुस्लिम मतदारांनी काँग्रेस, राष्ट्रवादी किंवा सपा यांना एमआयएम हा पर्याय स्वीकारला असल्याचे निकालानंतर स्पष्ट झाले आहे.

छपन्न वर्षाचे असदुद्दीन ओवेसी हे आक्रमक नेते आहे. मुस्लिमांचे प्रश्न ते जाहिरपणे व संसदेत प्रभावीपणे माडत असतात. ते उत्तम वक्ते आहेत. भाषणात ते संविधान व भारतीय कायद्याचे कलम सांगून पुरावे देत असतात. तथाकथित धर्मनिरपेक्ष पक्ष मोदींना देशाचे तिसऱ्यांदा पंतप्रधान होण्यापासून रोखू शकले नाहीत किंवा महाराष्ट्रात महायुतीला सत्तेवर येण्यापासून कोणी अडवू शकले नाही, अशी खंत त्यांनी बोलून दाखवली आहे. यापुढे राजकीय पक्षांना मुस्लिम मतदारांना गृहित धरता येणार नाही, असे त्यांनी बजावले आहे. महाराष्ट्रात जिल्हा परिषद निवडणुका लढविण्याचा त्यांच्या पक्षाचा विचार आहे तसेच पश्चिम बंगाल, तामिळनाडू. आसाम येथेही येणाऱ्या विधानसभा निवडणुका एमआयएम लढविणार आहे.

गेल्या काही वर्षापासून जसे हिंदुत्वाच्या नावावर मतांचे ध्रुवीकरण होते आहे तसेच मुस्लिम, ख्रिश्चन, आदी धर्मियांच्या नावावरही मतांचे एकत्रीकरण होते आहे. भाजपाने महापालिका निवडणुकीत एकाही मुस्लिमाला उमेदवारी दिली नव्हती. मुस्लिमांचा भाजपाला विरोध आहेच पण धर्मनिरपेक्ष म्हणविणारे पक्षही मुस्लिम समाजाला प्रतिनिधीत्व देत नाहीत हा या समाजाचा रोष आहे. लोकसभा विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडी होती, म्हणून मुस्लिमांनी आघाडीला मतदान केले. महापालिका निवडणुकीत आघाडी नव्हती म्हणून पर्याय म्हणून एमआयएमला पसंती दिली. मुस्लिम समाजावर कट्टरतावादी नेत्यांचा प्रभाव जास्त आहे, पुढील पाच वर्षांनी येणाऱ्या निवडणुकीत मुंब्रा संपूर्ण हिरवा करण्याचे आवाहन एमआयएमची नवनिर्वाचीत तरूण नगरसेविकेने करताच, समाजात जल्लोश झाला, यावरून देशभर लोकशाहीला धोका म्हणून आक्रोश प्रकटला. ध्रुवीकरणाला वेग आला तर त्याचा लाभ भाजपालाच होतो हे निवडणूक निकालाने सिध्द केले आहे.

एआयएमआयएम म्हणून देशात ओ्ळखल्या जाणाऱ्या या पक्षाचे नाव ऑल इंडिया मजलिस ए इत्तेहादुल मुसलमीन असे आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातच या पक्षाची स्थापना हैदराबाद संस्थानमधे झाली. इदेहत्त म्हणजे ऐक्य. समाजात ऐक्य भावना जोपासण्यासाठी व टिकविण्यासाठी एआयएमआयएम स्थापना झाली. सुरूवातीच्या काळात नवाब बहादूरयार जंग यांनी या संघटनेचा कारभार पाहिला. एआयएमआयएमची उभारणी व इतिहास हा संघर्षाचा आहे. बहादूरयार जंग यांच्यानंतर कासीम रझवी संघटनेचे अध्यक्ष झाले. त्यांच्या कार्यकर्त्यांनी रझा नावाची संघटना स्थापन केली. पोलीस कारवाईनंतर रझाकारांवर खटले दाखल झाले. कासीम रझवी यांनाही शिक्षा झाली. सुरूवातीला चंचलगुडा जेलमधे व नंतर पुण्याच्या येरवडा जेलमधे त्यांना ठेवण्यात आले. १९५७ मधे त्यांची सुटका झाल्यावर ते कराचीला निघून गेले व तिथेच त्यांचा १९७० मधे मृत्यु झाला. दरम्यान अबदुल वाहिद ओवेसी यांनी इत्तेहादुल मुसलमीनचे पुनरूज्जीवन केले व नंतर त्यांच पुत्र सुलतान सलाउद्दीन ओवेसी एमआयएमचे अध्यक्ष झाले. सलाउद्दीन ओवेसी हे हैदराबाद पालिकेच सदस्य होते. नंतर ते वेगवेगळ्या मतदारसंघातून आंध्र प्रदेशच्या विधानसभेत चार वेळा निवडून गेले. १९६२ ते प्रथम आमदार झाले. नंतर ते खासदार म्हणून निवडून गेले. सलाउद्दीन ओवेसी यांचे पुत्र असदुद्दीन ओवेसी हे १९९४ ते २००४ या काळात आंध्र प्रदेश विधानसभेत आमदार होते. नंतर ते हैदराबादमधून लोकसभेवर खासदार आहेत. असदुद्दीन यांचे भाऊ अकबरूद्दीन हे आंध्र प्रदेश विधानसभेत आमदार आहेत. एआयएमआएमने केवळ हैदराबादचा स्थानिक पक्ष ही ओळख पुसून आंध्र प्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, कर्नाटक अशी अनेक राज्यात मजल मारली आहे.

## स्वीकृत नगरसेवक पद राजकीय पातळीवर देण्यापेक्षा ; सामाजिक पातळीवर दिले तर राज्याचे नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले जाईल

राज्यात व जिल्ह्यात महानगरपालिका निवडणुका झाल्यात आणि त्यातुनच नगरची सेवा करण्यासाठी नगरसेवकांची नियुक्ती झाली आहे.या नगरसेवकांना जनतेचा कौल मिळाला त्यामुळे हे नगरसेवक जनप्रतिनिधींची भूमिका निभविणार आहेत.या व्यतीरीक्त प्रत्येक महानगरपालिकेमध्ये अंदाजे १५ नगरसेवकांमागे स्वीकृत नगरसेवक अशा पध्दतीचे त्या-त्या महानगरपालिकेमध्ये अंदाजे १० किंवा कमी-जास्त स्वीकृत नगरसेवकसेवकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.कोणाला स्वीकृत नगरसेवक करायचे हा अधिकार प्रत्येक राजकीय पक्षांच्या नेत्यांना असतोच यात दुमत नाही.परंतु राजकीय पक्षांसोबत जर सामाजिक कार्यातील व्यक्ती जुळली तर विकास भरभराटीला येईल.शहराच्या विकासाला खरोखरच गती यावी असे जर सरकारला वाटत असेल तर मग सामाजिक कार्यातील पत्रकार, लेखक, पर्यावरणवादी, अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्यांना स्वीकृत सदस्य म्हणून का घेऊ नये?जिथे विकास हे ध्येय आहे.तिथे त्याग हा असलाच पाहिजे व त्यागाची भावना राजकीय पक्षांनी ठेवली पाहिजे.याकरीता थोडे राजकारण बाजूला सारून सामाजिक कार्याला सुध्दा प्राधान्य दिले पाहिजे.त्याचप्रमाणे संपूर्ण राजकीय पक्ष आपापल्या पक्षांचे उमेदवार निवडून यावे यासाठी प्रयत्नशील असतात आणि असायलाच हवे.परंतु प्रत्येक महानगरपालिकेच्या अंतर्गत सामाजिक कार्यशैलीला कुठेतरी मानाचे स्थान असने गरजेचे आहे. सामाजिक कार्य करणारे निष्ठावंत,विचारवंत व समाजासाठी झटणारे वेगवेगळ्या क्षेत्रातील समाजसेवक सुद्धा असतात आणि आहेत त्यांचे कार्य अफाट असते परंतु दिसत नाही,ही बाब राजकीय पुढाऱ्यांनी सुद्धा लक्षात ठेवली पाहिजे.यात प्रामुख्याने पत्रकार, लेखक, साहित्यिक, स्वतंत्र पत्रकार, विचारवंत,पर्यावरण प्रेमी,निवृत्त अग्निशमन अधिकारी, सैन्यदलातील निवृत्त अधिकारी, निसर्ग प्रेमी इत्यादी अशा अनेक प्रकारच्या सतत सामाजिक कार्यासाठी झटणाऱ्या व गल्ली पासून तर दिल्ली पर्यंत व दिल्ली पासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत लेखणीच्या माध्यमातून असो अथवा आपापल्या कार्यक्षेत्राच्या माध्यमातून असो अशांचा मानसन्मान कुठेतरी व्हायला हवा व त्यांच्या कार्याची पावती त्यांना कुठेतरी पुरस्कार रूपात मिळायला हवी म्हणून स्वीकृत नगरसेवकांच्या रूपात त्यांना मानाचे स्थान मिळायला हवे असे मला वाटते. कारण राजकारणाच्या ठिकाणी राजकारण ठीक आहे.परंतु सामाजिक कार्याला एक नवी चालना देण्याच्या उद्देशाने सरकारने व प्रशासनाने पाऊल उचलले पाहिजे.कारण स्वीकृत सदस्य हा पर्याय सरकार जवळ असल्याने याला राजकारणात गूरफटने योग्य नाही.



रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार) नागपूर.
मो.नं.९९२१६९०७७९

यावर सरकारने, सन्माननीय राज्यपाल, सन्माननीय मुख्यमंत्री यांनी गांभीर्याने विचार करून सामाजिक कार्याला नवीन दिशा देवून विकासाला वेग देण्यासाठी एक नवीन पाऊल उचलने गरजेचे आहे.आज पत्रकार, लेखक आपल्या लेखणीच्या माध्यमातून गल्लीपासून तर आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंतची माहिती प्रत्येकांच्या घरोघरी पोहचविण्याचे कार्य करीत असतो. अशांना सरकारने स्वीकृत नगरसेवकांची जबाबदारी दिली तर सामाजिक कार्याला मोठी मदत होईल. राजकीय पुढारी हा आपल्या पद्धतीने कार्य करेलच यात दुमत नाही.परंतु सामाजिक क्षेत्रातील समाजसेवक हे आपले कार्य आगळ्यावेगळ्या पद्धतीने करून एक नवीन विकासाचे पाऊल उभे करू शकते व नवीन ऊर्जा निर्माण करू शकते. कारण सामाजिक कार्याची जाणीव व दांडगा अनुभव यांना पुर्वीपासूनच असतो फक्त साथ हवी सरकारची व राजकीय पक्षांची. त्यामुळे सरकारने राजकीय ताळमेळासोबत सामाजिक कार्याची बांधिलकी जपणाऱ्यांना जर सरकारने स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्ती केली तर शहराच्या विकासामध्ये मोठी भर पडेल व मदत होईल. सरकारला माझी विनंती आहे की स्वीकृत नगरसेवकांच्या बाबतीत सरकारने गांभीर्याने विचार करायला हवा.कारण अत्याधुनिक युगात शहर, राज्य, देश सध्याच्या परिस्थितीत विकासाचा महामेरू उभा करीत आहे यात स्वीकृत नगरसेवकसेवकांच्या माध्यमातून महानगरपालिकेमध्ये सामाजिक कार्याची भर पडली तर अवश्य त्याचे सोन होईल.कारण राज्यातील महापालिकांमध्ये जर सामाजिक कार्यातील व्यक्ती सहभागी झाली तर राज्यातील चित्र आगळेवेगळे दिसून येईल.कारण यामध्ये येणारे स्वीकृत नगरसेवक वेगवेगळ्या क्षेत्रातील असल्याने वेगवेगळ्या विषयांच्या माध्यमातून मनपामध्ये नवीन ऊर्जा निर्माण करण्याचे काम करतील.कारण त्यांचा दांडगा अनुभव व अभ्यास शहराच्या विकासासाठी हातभार अवश्य लावेल. स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती सामाजिक पातळीवर केली तर राज्याचे नाव देशामध्ये सुवर्ण अक्षरात कोरले जाईल.यासाठी सर्वच राजकीय पक्ष व सरकारने एकमत करून ताबडतोब निर्णय घेतला पाहिजे. जेणेकरून सामाजिक कार्याला नवीन चालना मिळेल.जय हिंद.

## राष्ट्रीय मतदार दिन

स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे दोन आपले राष्ट्रीय सण आहेत हे आपणा सर्वांना माहीतच आहे या दिवशी देशभक्ती ओसंडून वाहत असते पण या दिवसा इतकाच आजचा दिवसही तितकाच म्हत्वाचा आहे हे अनेक लोकांना माहीत नाही. आज २५ जानेवारी आज राष्ट्रीय मतदार दिन.आजच्याच दिवशी भारतीय लोकशाहीचा पाया रचला गेला. आजच्याच दिवशी म्हणजे २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली म्हणून हा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. भारतीय लोकशाहीने प्रत्येक सुजाण नागरिकाला मतदानाचा मूलभूत हक्क बहाल केला आहे. त्यामुळे मतदार यादीत नाव नोंदवून प्रत्येक नागरिकांनी निवडणुकीत आपले मतदान नोंदवून लोकशाही बळकट करावी असा उद्देश या दिवसामागे आहे. म्हणून या दिवशी भारत निवडणूक आयोग विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन मतदानासंदर्भात जनजागृती करते. या दिवशी १८ वर्ष पूर्ण झालेल्या नवीन मतदारांची नोंद करून त्यांना भारत निवडणूक आयोगाचे ओळखपत्र दिले जाते. मतदान हे प्रत्येक सुजाण नागरिकांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. १८ वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकांना संविधानाच्या अनुच्छेद ३२६ नुसार मतदानाचा हक्क दिला आहे. मतदान करणे ही देखील देशसेवाच आहे. त्यामुळे जास्तीतजास्त लोकांनी मतदान करुन भारतीय लोकशाहीला बळकट करायला हवे मात्र आपल्या देशात आजही मतदार मतदानाबाबत गंभीर आहेत असे दिसत नाही. घटनाकारांनी मतदानाचा अधिकार बहाल करून देशवासियांना खूप मोठे अस्त्र दिले आहे पण दुर्दैवाने आजही लोकांना त्याचे महत्व नाही म्हणूनच आपल्या देशात कोणत्याही निवडणुकीत ६० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान होत नाही याचाच अर्थ देशातील ४० टक्के मतदार मतदान करित नाहीत. भारतीय मतदारांचा मतदानाबाबतचा हा निरुत्साह लोकशाहीला मारक आहे. विशेष म्हणजे सुशिक्षित वर्गातच मतदानाविषयी निरुत्साह दिसून येतो. मतदानादिवशी राष्ट्रीय सुट्टी असते या दिवशी मतदान करण्याऐवजी सहकुटुंब सहलीला जाण्याचा ट्रेंड सुशिक्षित वर्गात दिसून येतो आपण एकट्याने मतदान केले नाही तर काय फरक पडणार असाच आविर्भाव या लोकांमध्ये दिसून येतो. जे मतदान करतात त्यातील काही लोक मतदान करण्याऐवजी आपल्या मताची विक्री करतात. रोटी, बोटी, आणि चपटीसाठी काही जण आपले मत अक्षरशः विकतात. अर्थात सर्वचजण असे करतात असे नाही. बहुतेक जण विचार करुन आपल्या देशासाठी, समाजासाठी योग्य अशा उमेदवाराला मतदान करतात हे ही नाकारून चालणार नाही अशा लोकांची संख्या वाढली पाहिजे. लक्ष्मी दर्शन



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

झाल्यानंतरच मतदान करणारे लोक बाबासाहेबांनी दिलेल्या या अस्त्राचा दुरुपयोग करतात. या लोकांमुळेच लोकशाही कलंकित होत आहे. बाबासाहेबांनी हे अस्त्र आपल्या हाती देण्यासाठी किती कष्ट सोसले याचीही जाणीव या लोकांना नाही. संविधानात मतदानाचा मूलभूत हक्क समाविष्ट करून बाबासाहेबांनी आपल्याला सर्वात मोठा हक्क मिळवून दिला आहे. आपलव हा मतदानाचा पवित्र हक्क बजावून प्रत्येकाने लोकशाही बळकट करायला हवी. प्रत्येकाने मतदानाचा हक्क जबाबदारीने बाजावल्यास देशाचे भविष्य बदलू शकते. त्यामुळे प्रत्येकाने निराशावादी भूमिका सोडून जागरूकतेने व स्वयंस्फूर्तीने प्रत्येक निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कार्यामध्ये आपला खारीचा वाटा उचलायला हवा. लोकशाहीचे बळकटीकरण करावयाचे असेल तर जागरुक मतदारांचा एक मोठा वर्ग अस्तिवात येणे आवश्यक आहे. त्यामुळे आपला देश विकसनशीलतेकडून विकसित देश होण्याकडे निश्चितच मदत होईल. १८ वर्षांपुढील सर्व सुजाण नागरिकांनी आगामी निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावला तरच राष्ट्रीय मतदार दिन साजरा केल्याचे सार्थक होईल.

## सूर्यनारायणाला मनोभावे पुजण्याचा दिवस : रथसप्तमी

विश्वमंडळातील सूर्यनारायणाचे महत्त्व आपण सर्वच जण जाणतो. आपल्या दिवसाची सुरुवात सूर्योदयाने होते. पृथ्वीवरील समस्त सजीवांना ऊर्जा पुरवणारा एक महत्वाचा घटक म्हणूनही सूर्याचा उल्लेख केला जातो. सूर्यग्रहणाच्या दिवशी काही क्षणापुरता पडणारा अंधार आपल्याला नकोसा वाटतो त्यामुळे सूर्याशिवाय जगण्याची आपण कल्पनाही करू शकत नाही, एव्हढे महत्व सूर्यनारायणाला आहे. सजीव-निर्जीवांमध्ये भगवंताचा वास आहे त्यामुळे जीवनमानात आपल्याला साहाय्य करणाऱ्या प्रत्येकांप्रती कृतज्ञ राहण्याची शिकवण हिंदू धर्म देतो. आपल्याला साहाय्यभूत ठरणाऱ्या चराचर वस्तूंप्रती आणि जीवांप्रती कृतज्ञतेचा भाव आपल्या अंतरी सदैव राहावा यासाठी आपल्या ऋषीमुनींनी सण आणि उत्सवांची निर्मिती केली आहे. नागपंचमीला नाग पूजला जातो तर बैल पोळ्याच्या दिवशी शेतकरी मित्र बैलाचे पूजन केले जाते, वसुबारसला सवत्स गाईची पूजा केली जाते. दसऱ्याला शस्त्रपूजन केले जाते, पितृपक्षात पूर्वजांच्या नावे कावळ्याला घास दिला जातो . असे कितीतरी सण आहेत ज्यांची निर्मिती केवळ कृतज्ञतेच्या भावातून केली आहे. रथसप्तमी हाही त्यातीलच एक सण. साऱ्या विश्वाला आपल्या तेजाने प्रकाशित करणाऱ्या सूर्यनारायणाला मनोभावे पुजण्याचा दिवस म्हणजे रथसप्तमी. सूर्यदेवाला साधना करतांना स्थिर उभे रहायला लागल्याने उभे राहून त्याला त्याची गति सांभाळता येत नव्हती. त्याचे पाय दुखू लागले आणि त्यामुळे त्याची साधना नीट होत नव्हती. त्याने परमेश्वराजवळ त्याविषयी तक्रार केली आणि बसण्याची व्यवस्था करण्यासंदर्भात सांगितले. मी बसल्यानंतर माझी गति कोण सांभाळणार, अशी त्याने परमेश्वराजवळ विचारणा केली. तेव्हा परमेश्वराने सूर्यदेवाला बसण्यासाठी सात अश्व असलेला सोन्याचा हिरेजडीत रथ तयार करून दिला. ज्या दिवशी सूर्यदेव त्या रथात विराजमान झाले, तो दिवस म्हणजे रथसप्तमी. याचा अर्थ सात घोड्यांच्या रथ. माघ महिन्यात सहस्रांशू नावाने सूर्याची पूजा करण्याची परंपरा आहे. असे केल्याने रोग आणि समस्या दूर होतात तसेच आयुर्मानही वाढते असे म्हटले जाते. माघ महिन्याच्या सप्तमीला सूर्यपूजा आणि उपवास केल्याने मनोकामना पूर्ण होतात, असेही पुराणात सांगितले आहे.

रथसप्तमीला सूर्योदयापूर्वी स्नान करावे. सूर्यदेवाची नावे घेऊन सूर्यनमस्कार घालावेत. पाटावर रथात बसलेल्या सूर्यनारायणाची आकृती काढून त्याची पूजा करावी. त्याला तांबडी फुले वाहावीत. सूर्याला प्रार्थना करून आदित्यहृदयस्तोत्रम्, सूर्याष्टकम् आणि सूर्यकवचम्, यांपैकी एखादे स्तोत्र भक्तीभावाने म्हणावे किंवा ऐकावे. रथसप्तमीच्या दिवशी कुठलेही व्यसन करू नये. रथसप्तमीच्या दुसऱ्या दिवसापासून प्रतिदिन सूर्याला प्रार्थना करावी आणि सूर्यनमस्कार घालावेत. त्यामुळे उत्तम आरोग्य प्राप्त होते. सूर्यकिरणांतून शरिराला आवश्यक असलेले ड जीवनसत्त्व मिळते. काळाचे मोजमाप सूर्यावरच अवलंबून आहे. सूर्य हा ग्रहांचा राजा असून त्याचे स्थान नवग्रहांमध्ये आहे. तो स्थिर असून अन्य सर्व ग्रह त्याच्याभोवती प्रदक्षिणा घालतात. सूर्य स्वयंप्रकाशी असून अन्य ग्रह त्याचा प्रकाश घेतात. सूर्योपासनेला हिंदु धर्मात अधिक महत्त्व आहे. सूर्याला प्रतिदिन अर्घ्य दिल्याने अंधःकार नष्ट करून जग प्रकाशमय करण्यासाठी सूर्याला बळ मिळते असेही म्हटले जाते.

रांगोळीने किंवा चंदनाने पाटावर सात घोड्यांचा सूर्यनारायणाचा रथ, अरुण सारथी आणि रथात सूर्यनारायण काढतात. सूर्यनारायणाची पूजा करतात. अंगणात गोवऱ्या पेटवून त्यांवर एका बोळक्यात दूध उतू जाईपर्यंत तापवतात; म्हणजे अग्नीला समर्पण होईपर्यंत ठेवतात. त्यानंतर उर्वरित दुधाचा सर्वांना प्रसाद देतात. सुनेचे तीळवण, जावयाचे प्रथम वाण आणि बाळाचे बोरवण या दिवशी करतात. या वेळी सुनेला, जावयाला आणि बाळाला हलव्याचे दागिने करतात. स्वतः तप्त राहून साऱ्या सूर्यमंडळाला प्रकाशमान करणाऱ्या, कधीही विश्रांती न घेता अविरत सेवेत राहणाऱ्या सूर्यनारायणाच्या चरणी या रथसप्तमीच्या दिनी कोटी कोटी वंदन !



सौ. मोक्षदा घाणेकर,
काळाचौकी, मुंबई

## यातुन आपण काय साधलं....

नोटबंदीचा फसवा प्रयोग कसा झाला याबाबत अनेकांनी याचिका न्यायालयात सादर केल्या त्या अनुषंगाने कोर्टानी सोईस्कररित्या निकाल दिलेला दिसुन येतो. नोटबंदीच्या वादळाने संपूर्ण देष ढवळुन निघाला आणि त्या पंन्नास दिवसाच्या काळात ३०० हून अधिक बँकेच्या गर्दीत मृत्युमुखी पडले होते. तरीपण, पुर्ण नोटा जमा करू शकलो नाही. हा तर नोटबंदीचा फसवा प्रयोगच म्हणावे लागेल ? आता इतके दिवस होऊन सुध्दा यावर नोटबंदीचा फसवा प्रयोग म्हणण्याऐवजी आपण सोईस्कर रित्या फसलेल्या प्रयोगाला चांगलेच प्रमाणपत्र देत आहोत हे आपल्या सर्वांसाठी शोकांतिका नाही काय ? पण नोटबंदीच्या झालेल्या प्रयोगाला कुणीच बदलवु शकत नव्हते. हा मुद्दा सर्वानुमते अवैद्य असला तरीपण न्यायालयाने सोयीस्कर रित्या टाळला असेच म्हणावे लागेल. प्रत्येक सरकारला आपली स्वतःची दिषा ठरविण्याचा अधिकार घटनेने दिला असला, तरी पण संसदेची रितसर मंजुरी घेणे जरूरी नाही काय ? कारण हा प्रष्न सर्वसामान्य जनतेषी संबंधीत असल्यामुळे सविस्तरपणे चर्चा करणे व निर्णय घेणे आपले कर्तव्य नसावे काय ? म्हणूनच नेपोलियन म्हणतात कीज्याना हरण्याची भिती आहे त्यांचा पराभव निष्चित आहे.

किंबहुना, या दुराग्रही निर्णयाने साया देषाला सरकारने वेठीस धरले होते. नोटा बदल करण्यासाठी व काढण्यासाठी स्वतःलाच व्यक्ती चोर समजू लागले होते. नोटबंदीचा निर्णय आर.बि.आय. च्या माध्यमातुन राबवून डिमोनिटायझेषन सक्सेस असा आव आणला गेला होता. या स्वायत्त संस्थेची जपलेली सारी प्रतिष्ठा धुळीला मिळविली गेली. असा विचित्र भावकल्लोळ देषामध्ये सुरू होते असे आपल्याला नोटबंदीने दिसुन आले होते.परिणामतः देषात असंघटित क्षेत्रातले कोटयावधी मजुर कामगार देषोधडीला लागलेले दिसुन आले. लक्षावधी तरूणाना त्यांच्या असलेल्या नोकाया गमवाव्या लागल्या. तरीही आपण नोटबंदीचे समर्थन करतो आहे.

नोटबंदी निर्णयाची प्रक्रिया फारच कमी वेळात केली गेली होती हे आपल्या सर्वांसाठी अतिसंवेदनषील शोकांतिका नाही काय? नोटबंदीबाबत सर्वोच न्यायालयाने जे निरिक्षणे नोदविलेले आहे, याकडे सरकारने वेळीच लक्ष देणे अगत्याचे आहे. नोटबंदीचा परिणाम व्यवहारात सामान्य लोकांवर व इतर माध्यमावर काय झाला हे बघणे, ठरविणे महत्वाचे नाही काय ? नोटबंदीने आपण काय साधलो, हे निष्चितपणे सांगणे यावर अजुनही प्रष्न चिन्ह असु षकते. तरीपण, भविष्यात या फसलेल्या विषयावर नेहमीच चर्चा होत राहील हे मात्र खरे ! पण यावर असे सांगणे गरजेचे वाटते की, कोणताही अतिसंवेदनषील व सामान्य लोकांषी निगडीत असलेल्या कार्याबाबत निर्णय घ्यावयाचा असेल तर ती चर्चा संसदेत होणे अनिवार्य आहे असे म्हणणे निष्चित रूपाने खरे ठरावे.

* विजय सरस्वती सीताराम सोनारघरे, * उदयनगर, गल्ली नं. ४, नागपूर ४४००२४ *

# पेसा : एक अति महत्वाचा पण दुर्लक्षित कायदा

ग्रामीण भागातील दुर्गम आदिवासी क्षेत्राच्या भागातील शेतकरी, ग्रामस्थ लोकांना विशेष हक्क देणारा पेसा कायदा अत्यंत महत्वाचा असूनही दुर्लक्षित आहे. आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या बऱ्याच संस्थांना (काही अपवाद वगळता) ह्याची माहिती नाही असे दिसून आले.

आज काल वन भागातील जमिनी बळकावून तिथे मोठे सौर ऊर्जा, पवन चक्की, जल विद्युत निर्मिती साठी प्रकल्प उभारले जात आहेत. तेथील गौण वन उत्पादने ताब्यात घेतली जात आहेत. खाणी उद्योग उभारले जात आहेत. त्या सर्वांना कायदेशीर रित्या प्रतिबंध करण्याची शक्ती ह्या ग्रामसभेच्या निर्णया मध्ये आहे. ह्यावरून ह्या कायद्याची उपयुक्तता लक्षात येईल. त्यामुळे ह्याची माहिती करूंन घेणे आवश्यक आहे.

वारकरी संप्रदायातील ८०% लोक हे शेतकरी असून विठ्ठलाच्या भक्ती रसात न्हाऊन गेल्यामुळे त्यांच्या वरील होणारे अन्याय, शोषणाचा त्यांना विसर पडला आहे. तसेच ९०% आदिवासी हे सुद्धा शेतकरीच आहेत. त्यांच्या शिक्षण, सामाजिक आणि आर्थिक मागासलेपणा ह्यामुळे संविधानाने दिलेल्या शक्तीची त्यांना जाणीव नाही.

आपल्या देशाला वैविध्यपूर्ण प्राचीन आदिवासी संस्कृतीचा वारसा लाभलेला आहे. त्यामध्ये ७०० आदिवासी जमाती आहेत. त्यांची संस्कृती, परंपरा आणि भोवतालचा नैसर्गिक परिसर यांचे जतन करता यावे म्हणून सन १९९६ साली सरकारने पेसा कायदा म्हणजेच पंचायत (अनुसूचित क्षेत्रांपर्यंत विस्तार) कायदा (PESA Act)- The Provisions of the Panchayats (Extension to the Scheduled Areas)Act, 1996 हा पारित केला. त्याद्वारे अनुसूचित (आदिवासी) क्षेत्रांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना व ग्रामसभेला विशेष अधिकार प्रदान करण्यात आले. व ग्रामसभा ही स्वयंपूर्ण व सर्वोच्च निर्णय संस्था मानली गेली आहे.

ह्या कायद्याच्या अंमलबजावणी साठी नियम करायला सर्वच राज्यांनी खूप विलंब केला होता. महाराष्ट्राने ह्या बाबतचे नियम २०१४ साली पारित केले आहेत.

महाराष्ट्रामध्ये १३ जिल्ह्यातील ५९ तालुके आणि ५९०५ गावे अनुसूचित क्षेत्र घोषित केली आहेत, ज्यांना पेसा कायद्यामुळे विशेष अधिकार मिळतात. गाव म्हणजे सामान्यतः एक वस्ती किंवा वस्त्यांचा समूह किंवा एक खेडे किंवा एक समुदाय असलेल्या आणि परंपरा आणि रीतिरिवाजांनुसार त्याचे व्यवहार व्यवस्थापित करणाऱ्या खेड्यांचा समूह. ज्या ठिकाणी आदिवासीची लोकसंख्या प्रामुख्याने जास्त आहे.

पेसा कायद्यामुळे नैसर्गिक संसाधनांवर जसे जंगलातील लघु वनउपज (तेंदूपत्ता, महुआ, मध, बांबू, बहू उद्देशीय फुले, करवंदे, जांभळे वगैरे) गोळा व विक्रीचा ग्रामसभेला अधिकार दिला आहे.

ग्रामसभेच्या संमती शिवाय जमिनीचे हस्तांतरण, भुसंपादन करता येत नाही. अश्या काही केसेस आहेत जिथे न्यायालयीन लढा न देता, पेसा कायद्याच्या तरतुदीमुळे त्यांना जमीन परत मिळाली आहे.

आदिवासी दुर्गम भागात जाऊन (जिथे काहीही साधन, सुविधा नाही) काम करणारे अनेक नेते, सामाजिक कार्यकर्ते महाराष्ट्रात आहेत ही अभिमानाची गोष्ट आहे. त्यांनी ह्या कायद्याचा अभ्यास करून बेकायदेशीर खाणकाम, विकासाच्या नावाखाली पर्यावरणाला हानी पोहचवणारे मोठे प्रकल्प, उद्योग यांना 'ग्रामसभेची पूर्वसंमती आवश्यक' ह्या निकषावर लढे दिले आहे.

गौण जलस्रोताचा वापर, सिंचन ह्याचे व्यवस्थापन करण्याचे पूर्ण अधिकार ग्रामसभेला दिले आहेत. सर्व ग्रामस्थांचे समान अधिकार असून सम प्रमाणात पाणी वाटप व्हावे असे अभिप्रेत आहे.

थोडक्यात आदिवासी समाजाला त्यांच्या भूमी, जंगल, जल यांच्या संरक्षण व व्यवस्थापनाचा हक्क आणि निर्णय प्रक्रियेवर स्वायत्तता देण्यात आली आहे.

अशा रीतीने स्थानिक समुदाय नैसर्गिक संसाधनांवर नियंत्रण देऊन, पेसा कायदा शाश्वत विकासाला प्रोत्साहन देतो. शतकानुशतके निसर्गाशी सुसंगत राहून जगणारे आदिवासी पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत पद्धतीने संसाधनांचे व्यवस्थापन करू शकतात.

दारू उत्पादन, विक्री व सेवन यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार तसेच सामाजिक व सांस्कृतिक परंपरांचे संरक्षण करण्याचे स्वातंत्र्य बहाल केले आहे.

आदिवासी समुदायांच्या परंपरा, चालीरीतींचे रक्षण आणि जतन करणे, रीतिरिवाज व सांस्कृतिक ओळख जपणे ही तर मुख्य उद्दिष्टे आहेतच.

शासन निर्णया प्रमाणे अनुसूचित क्षेत्रातील पेसा ग्रामपंचायतीना दर वर्षी आदिवासी उपयोजनेच्या नियतव्ययाच्या ५% थेट निधी देण्यास मान्यता दिली आहे.

खर्चाचा आराखडा तयार करणे, योजना ठरवणे, निधीचा विनियोग, पाणलोट क्षेत्र विकास वगैरे ठरविण्याचा अधिकार ग्रामसभेला आहे.

सोप्या भाषेत, पेसा कायद्या मुळे आदिवासी लोकांना स्वशासनाचा अधिकार प्राप्त झाला. तसेच 'त्या भागातील नैसर्गिक साधन संपत्ती वर त्यांचा हक्क आहे' ह्या तत्वाला कायदेशीर कवच मिळाले.

परंतु प्रस्थापित सत्ताधारी, राजकारणा मुळे हेतू चांगला असूनही अंमलबजावणी न झाल्यामुळे अखर्चित निधी परत वर्ग केला जातो. त्यामुळे आदिवासी लोकांचे प्रशिक्षण, क्षमता बांधणी, लोक सहभाग अतिशय महत्वाचा आहे.

पेसा कायद्याने राज्य सरकारवर सुद्धा बंधने घातली आहेत की त्यांनी पेसा कायद्याशी विसंगत कायदे करू नयेत, ज्यामुळे ग्रामसभेचे अधिकार कमी होतील.

परंतु असे अनेक परस्परविरोधी कायदे आहेत जसे वन हक्क कायदा (२००६), जमीन संपादन, पुनर्वसन आणि पुनर्वसनात उचित भरपाई आणि पारदर्शकतेचा अधिकार कायदा (२०१३), वन्यजीव संरक्षण कायदा, संसाधन उत्खननावरील राज्य धोरणे वगैरे पेसाच्या तरतुदींशी आणि आदिवासी समुदायांना दिलेल्या अधिकारांशी विसंगत आहेत. ज्यामुळे गोंधळ निर्माण होतो आणि प्रभावी अंमलबजावणीत अडथळा येतो.

स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे झाली तरी आपण बघतो की ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, आरोग्य, सांडपाणी व्यवस्था, रस्ते, वीज, शिक्षण, स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवणे वगैरेची दुरावस्था आहे. तर पेसा अंतर्गत लोकांचे हाल विचारायला नको. तिथे अति कुपोषित बालकांचे प्रमाण, बाल विवाह वगैरे समस्या अजून आहेत. पिढ्यानी पिढ्या शेती करून त्यांना दावा मंजुरी पत्र मिळते पण जमिनीवर मालकी हक्क (सात बारा) मिळत नाही. ते सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत.

प्रामुख्याने विदर्भामध्ये सामूहिक किंवा व्यक्तिगत 'निस्तार हक्क' देण्यात आलेले आहे. त्यामध्ये त्यांना वन विभागातील जळणासाठी लाकडे, मुरुम, दगड, माती वगैरे घरगुती उपयोगासाठी गौण खनिजे, वनौपज आणणे तसेच या जमिनीतून गुरे चारणे वगैरे अधिकार मिळाले आहेत.

मुख्य दुर्लक्षित प्रश्न हा आहे की अजूनही सुमारे ५०% आदिवासी हे घोषित अनुसूचित क्षेत्राच्या बाहेर आहेत. व पेसा मधील तरतुदी पासून वंचित आहेत. खरे तर आदिवासी बहुल वन क्षेत्राचे 'आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्थे' मार्फत नव्याने सर्वेक्षण करून राज्यपालांनी अश्या गावांचा अनुसूचित क्षेत्रात समावेश करणे जरुरी आहे. तसेच पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणी साठी प्रयत्न होणे जरुरी आहे.

सतीश देशमुख
९८८१४९५५१८

### अशोकायन...

**भाषा पंधरवाडा**

बाह्य उपचार कितीही करा
भाषा होणार नाही सुदृढ
बोला मराठी लीहा मराठी
प्रचलनात भाषा होईल रुढ ..

'माय मराठी ' म्हणवून घेता
करता तिच्याशी दुजा भाव
अन्यभाषिक का स्विकारतील
विचारा प्रश्न मनालाच राव ? .

पाट्या बदला टोप्या बदला
बदला तुम्ही झेंडे
मनी परिवर्तन नाही तोवर
परिणाम दिसून येईल का गडे



प्रा.अशोक सारडा मेहकर
(९४२२३९४३३९)

# भक्तिमार्ग

## उपयुक्त श्लोक

धर्मग्रंथांमधून

हिंदूंच्या धार्मिक ग्रंथांमधले काही श्लोक, दोहे बरंच शिकवून जातात. त्यातली शिकवण आजच्या काळातही कामी येऊ शकते.

* गीतेमध्ये त्रिविधं नरकस्येदं, द्वारं नाशनमात्मन:। काम: क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत। हा श्लोक आहे. याचा अर्थ असा की, काम, क्रोध आणि लोभ ही आत्म्यांचा नाश करणारी द्वारं आहेत. त्यामुळे त्या त्यागायला हव्यात.

* तस्माधस्य महाबाहो निगृहीतानि सर्वश:। इंद्रियाणिइंद्रियार्थे भ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता या गीतेतल्या श्लोकाचा अर्थ असा की, ज्या माणसाची इंद्रियं आणि इंद्रियांशी संबंधित बाबी ताब्यात असतील त्याची बुद्धी स्थिर असते.

* तुलसी साथी विपत्ती के विद्या विनय विवेक। साहस सुकृती सुसत्यव्रत राम भरोसे एक। या दोह्यातून तुलसीदास म्हणतात, कठिण प्रसंगी ज्ञान, नम्रता, विवेक, धाडस आणि रामाचं नाम आपली साथ देतात.

* अल्पानमपि वस्तूनाम संहति: कार्यसाधिका। तृणैर्गुणत्वमापन्नै: बंध्यते मत्तदंतिन:। या श्लोकाचा अर्थ छोट्या गोष्टींचा वापर आणि मेळ यामुळे महान कार्यं करता येतात. गवताची छडीही हत्तीला नियंत्रणात ठेवते.

## आचार पुण्यमार्गाचा...



दासबोधातून...

कोमल वाणी दे रे रामा। विमल करणी दे रे रामा।

विमल म्हणजेच पुण्यमार्गाच्या आचाराबरोबरच माणसाचं बोलणंही शुद्ध, सात्विक आणि सौजन्याचं हवं असा उपदेश समर्थ रामदास स्वामी देतात. ते पुढे म्हणतात,

तोंडी सीवी असो नये। दुसऱ्यास देखोन हांसो नये। उणे अंगी संचारो नये। कुळवंताचे।। येकाचा घात करु नये। लटिकी गोही देऊं नये। अप्रमाण वर्तू नये। कदाकाळीं।। समी यावा चुकों नये। सत्वगुण सांडूं नये। वरियास दंडू नये। शरण आलिया।।

इथे श्रीसमर्थांनी विचार आणि कृती यांच्या शुद्धतेबरोबरच उच्चाराच्या शुद्धतेवरही भर दिला आहे. अनोळखी माणसाच्या कृतीपूर्वीच त्याच्या बोलण्यावरुन आपण परीक्षा करत असतो. अनेकांच्या तोंडात लहानपणापासूनच काही अपशब्द बसलेले असतात. काही गावांमध्ये, भागांमध्ये एखादी शिवी इतकी रुढ झालेली असते की तो अपशब्द आहे असं तिथल्या लोकांना वाटतच नाही. मात्र परक्या माणसाने त्यांचं बोलणं ऐकलं तर तो भांबावून जातो. म्हणूनच श्रीसमर्थ म्हणतात, तोंडात शिवी असू नये आणि दुसऱ्याची फजिती पाहून कधी हसू नये. एखाद्या थोरामोठ्या कुळशीलवंताचं एखादं न्यून बघून हसू नये कारण दुर्दैवाच्या दशावतारात कोणावरही अशी वेळ येऊ शकते. तेव्हा आपल्या मनाचा मोठेपणा अबाधित ठेवून मौन पाळावं. श्रीसमर्थ क्षुल्लक कारणांवरुन वाद घालण्याची सवय त्याजण्याविषयी सुचवतात. कोणी आग्रह धरला म्हणून खोटी साक्ष देऊ नये, कुमार्गाचं वर्तन करु नये, कोणाचा विश्वासघात करु नये, चहाडी-कुचाळकी-परस्त्रीगमन करु नये असंही श्रीसमर्थ सांगतात. कोणावरही अपरोक्ष टीका करणं, निंदा करणं हीनपणाचं आणि म्हणूनच त्याज्य असल्याचं ते सांगतात.

## घटना, भारताची पवित्र गाथा

भक्ती विशेष

**राष्ट्रीय सण म्हणून साजऱ्या होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाला आपल्या लोकशाही यंत्रणेमध्ये वेगळं महत्त्व आहे. घटनेने प्रत्येक भारतीयाला अधिकार दिलेले आहेत. सन्मानाने जगण्याचे अधिकार देणारी आपली घटना कोणत्याही धर्मग्रंथापेक्षा कमी महत्त्वाची नाही. म्हणूनच यानिमित्ताने प्रत्येकाने या राष्ट्रग्रंथाचं पावित्र्य टिकवण्याचा, महत्त्व अबाधित ठेवण्याचा प्रयत्न करायला हवा. हे आपलं प्रथम कर्तव्य आहे.**

देशप्रेमी भारतीयांसाठी अन्य सणांएवढाच महत्त्वाचा सण म्हणजे प्रजासत्ताक दिन आणि गीतेप्रमाणेच पवित्र अशी आपली राज्यघटना... म्हणूनच दरवर्षी २६ जानेवारीला प्रत्येक भारतीयाच्या मनात सदोदित तेजाळणार राष्ट्रतेज अधिकच प्रखर झालेलं दिसतं. विविध उपक्रमांद्वारे मोठ्या धामधुमीत हा दिवस साजरा केला जातो. शालेय विद्यार्थ्यांपासून वृद्धांपर्यंत सर्वच जण यादिवशी मोठ्या श्रद्धाभावाने तिरंग्याला वंदन करतात. दिल्लीत संपन्न होणारी परेड पाहताना प्रत्येक भारतीयाचा ऊर अभिमानाने भरुन येतो. शौर्यपदक पटकावणाऱ्या लष्करी अधिकाऱ्यांना मनोमन वंदन केलं जातं, त्यांच्या पराक्रमाला दाद दिली जाते. हा दिवस वीरांची शौर्यगाथा गाण्याचा, विविध संस्कृतीचा उद्घोष करण्याचा, लोकशाहीची मूल्यं जपण्याचा निर्धार करण्याचा आणि समाजातील बंधुभाव वृद्धिंगत करण्याचा एक सुयोग्य मुहूर्त आहे असंही आपण म्हणू शकतो. पण हा दिवस साजरा करताना काही मुद्दे विचारात घ्यायला हवेत जे समयोचित ठरतील.

आपल्या राज्यघटनेच्या उपोद्घातामध्ये (प्रिॲम्बल) आम्ही भारतीय लोक किंवा वी द पीपल ऑफ इंडिया असा उल्लेख आहे. म्हणजेच या राज्यघटनेचं सार्वभौमत्व या देशातील जनतेकडे आहे आणि म्हणूनच हे जनतेचं प्रजासत्ताक आहे, असं म्हटलं जातं. यावरून या देशातील संसद, राष्ट्रपती तसंच न्यायसंस्था सार्वभौम नाहीत, हे स्पष्ट होतं. या देशातील जनता सार्वभौम आहे. शिवाय आपल्या देशात संसदेला अधिकार देताना कायदा करा, परंतु अमूक एका क्षेत्रात जायचं नाही, अशा स्वरूपाचं बंधन घालण्यात आलेलं आहे. त्यात जनतेच्या मुलभूत हक्कांच्या क्षेत्राचा समावेश होतो. साहजिक संसदेला जनतेच्या मुलभूत हक्कांवर गदा आणणारे कायदे करता येत नाहीत. १९७७ मध्ये देशात आणीबाणी पुकारण्यात आली तेव्हा देशातील नागरिकांच्या मुलभूत हक्कांवर गदा येत असल्याचं सांगत या संदर्भातील घटनादुरुस्ती सर्वोच्च न्यायालयानं नाकारली होती, हे लक्षात घ्यायला हवं. यावरून घटनेचं पालकत्व उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांकडे सुरक्षित असल्याबद्दलचा विश्वास जनतेच्या मनात निर्माण झाला. परंतु आजवर न्यायव्यवस्थेवर अकार्यक्षमतेचे, गैरप्रकाराचे, घराणेशाहीचे आरोप झाले नव्हते. आता होणारे अशा पध्दतीचे आरोप जनतेला विचलित करणारे आहेत, असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही.

न्यायालयात कोणी पक्षकार, वकील किंवा न्यायाधीश न्यायालयाची अप्रतिष्ठा होईल असं वागल्यास न्यायालयाच्या अवमानप्रकरणी योग्य शिक्षा देता येते. मुख्य म्हणजे न्याययंत्रणेच्या कामकाजात पंतप्रधान किंवा संसद हस्तक्षेप करणार नाहीत, असाही संकेत आहे आणि तो आजवर पाळण्यात आला आहे. या परिस्थितीत आजवर न्याययंत्रणेने आपली जबाबदारी चोख पार पाडल्याचं पहायला मिळतं. परंतु गेल्या काही दिवसांमध्ये अशा काही घटना घडू लागल्या आहेत, ज्यातून न्याययंत्रणेतील सुधारणांची गरज प्रकर्षाने जाणवू लागली आहे.

मध्यंतरी सर्वोच्च न्यायालयातील चार न्यायाधीशांनी या न्यायालयात काम नीट होत नसल्याबद्दल आक्षेप नोंदवला. हा वाद घटनापीठावरून निर्माण झाला होता. एखाद्या प्रकरणात सुरुवातीला दोन न्यायाधीशांचा निकाल चुकीचा असल्याची तक्रार पुढे आल्यास ते प्रकरण अधिक संख्येच्या न्यायाधीशांच्या पीठाकडे सोपवलं जातं. अशा रितीने जास्तीत जास्त अकरा न्यायाधीशांच्या पीठासमोर प्रकरणाची सुनावणी केली जाऊ शकते. कोणतं प्रकरण कोणत्या न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे सोपवायचं हे ठरवण्याचे अधिकार न्यायपालिकेतील व्यवस्थापकांना म्हणजे ॲडमिनिस्ट्रेटरना असतात. असं असलं, तरी या घटनापीठामध्ये मुख्य न्यायाधीश हे वरिष्ठ, अनुभवी असावेत, अशी अपेक्षा असते. मात्र, ठराविक प्रकरणांबाबत नेमलेल्या घटनापीठात वरिष्ठ न्यायाधीशांना डावललं जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. ही बाबही विचार करायला लावणारी आहे. आपल्या राज्यघटनेप्रमाणे राष्ट्रपती हे न्यायाधीशांची नियुक्ती करतात. कायद्यातील कलम १२६ प्रमाणे संबंधित न्यायाधीशांच्या नेमणुकीची ऑर्डर काढली जाते. या नियुक्त न्यायाधीशांना राष्ट्रपतींसमोर पद आणि गोपनियतेची शपथ घ्यावी लागते. याचा दुसरा अर्थ असा की, राष्ट्रपती हे चीफ ऑफ जजेस ऑथॉरिटी आहेत. त्या दृष्टीने विचार करायचा तर अलिकडच्या प्रकरणात सरन्यायाधीश ऐकत नाहीत, असं सांगणाऱ्या न्यायाधीशांना पत्रकार परिषदेत आपलं गाऱ्हाणं मांडण्याऐवजी राष्ट्रपतींकडे जाणं गरजेचं होतं असं म्हणावं लागेल.



या संदर्भात आणखीही एक मुद्दा समोर येतो. तो म्हणजे राष्ट्रपती न्यायाधिशांची नेमणूक करत असतील तर अशा प्रसंगात त्या न्यायाधीशांना तसंच त्यांच्या विरोधात तक्रार करणाऱ्यांना बोलावून बैठक घेणं राष्ट्रपतींना शक्य होतं. परंतु तसं झालं नाही. यामुळे या लोकशाहीचा महत्त्वाचा स्तंभ असणाऱ्या न्याययंत्रणेबाबत उलट सुलट चर्चा होत राहिली. या देशात दीर्घकाळ लोकशाही व्यवस्था अबाधित राहण्यामागे राज्यघटना आणि न्यायपालिकेचा वाटा महत्त्वाचा राहिला आहे. या सार्वभौम प्रजासत्ताकाच्या यापुढील वाटचालीतही या यंत्रणेवर जनतेचा विश्वास कायम राहील, अशी आशा प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने व्यक्त करू या.



## भलेई माता मंदिर

तीर्थक्षेत्र

हिमाचल प्रदेशला देवभूमी म्हटलं जातं. या राज्यात हिंदूंची अनेक धार्मिक स्थानं आहेत. त्यापैकी एक म्हणजे भलेई माता मंदिर. चंबा जिल्ह्यात हे मंदिर वसलं आहे. या स्थानी भक्त मोठ्या संख्येने येतात. या ठिकाणी भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात, असं मानलं जातं. या मंदिरातल्या देवीच्या मूर्तीला घाम येतो, असं म्हणातात. मूर्तीला घाम येणं म्हणजे मनोकामना पूर्ण होणं असं भक्तमंडळी मानतात. मूर्तीला घाम येत असताना त्या ठिकाणी उपस्थित असणाऱ्या भक्तांच्या मनातल्या सगळ्या इच्छा पूर्ण होतात, असं म्हणतात. आपण उपस्थित असताना देवीच्या मूर्तीला घाम यावा, अशी इथे येणाऱ्या भाविकांची इच्छा असते. या मंदिराबाबत एक आख्यायिका सांगितली जाते. ती अशी की, भ्राण नावाच्या स्थानी एका झोपडीत देवी माता प्रगट झाली होती. त्यावेळी देवीने चंबाचा राजा प्रतापसिंहला स्वप्नात दृष्टांत दिला. आपल्या मूर्तीची स्थापना चंबा इथे करावी, असा आदेश देवीने त्याला दिला. देवीची मूर्ती चंबा येथे नेत असताना भलेई हे स्थान देवीला आवडलं. त्यानंतर तिने त्याला पुन्हा दृष्टांत दिला आणि याच ठिकाणी स्थापना करायला सांगितलं. त्यामुळे भलेई या स्थानी देवीचं मंदिर बांधण्यात आलं. सुरूवातीला या मंदिरात महिलांना प्रवेश बंदी होती पण नंतर ही बंदी उठवण्यात आली.




## उपयुक्त गुरुमंत्र

मंत्रजागर

आयुष्यातल्या अडचणी सोडवण्यासाठी आपल्या प्रयत्नांसोबतच विशिष्ट मंत्रही उपयुक्त ठरतात. बृहस्पती हे देवगुरू मानले जातात. बृहस्पतीच्या उपासनेमुळे ज्ञान, बुद्धी, कौटुंबिक सुख मिळतं, असं मानलं जातं. बृहस्पतीच्या उपासनेसाठी गुरूवार हा सर्वात उत्तम दिवस मानला गेला आहे. ज्योतिषशास्त्रानुसार गुरू हा शुभ ग्रह मानला गेला आहे. गुरू मंत्राच्या जापाने आयुष्यातल्या अडचणी दूर होऊ शकतात. गुरू मंत्र आणि बृहस्पतीच्या उपासनेविषयी जाणून घेऊया.

* ऊं ग्रां ग्रीं ग्रौं स: गुरवे: नम:
* ऊंऐं श्रीं बृहस्पतये नम:
* ऊं गुं गुरवे नम:
* ऊं बृं बृहस्पतये नम:
* ऊंक्लीं बृहस्पतये नम:

यापैकी एक मंत्र दर गुरूवारी म्हटल्याने अडचणी दूर व्हायला मदत होते.

पीतांबर पीतवपु: किरीटी चतुर्भुजो देवगुरू प्रशान्त:। यथाक्षसूत्रं च कमण्डलुच्च दण्ड च विभ्रद्वरदोस्तु।। या गुरूमंत्राचा जप आपल्या इष्टदेवतेला स्मरण करून करावा.

बृहस्पतीची आराधना करायची असेल तर सकाळी स्नान करून नवग्रह मंदिरात बृहस्पतीच्या मूर्तीला केशरयुक्त दूध किंवा गंगाजलाने अभिषेक करावा. त्याला गंध, अक्षता, पिवळं वस्त्र, पिवळी फुलं अर्पण करावीत. केळं आणि पिवळ्या रंगाच्या मिठायांचा नैवेद्य दाखवावा. पूजनानंतर चण्याच्या डाळीचं दान करावं. केळ्याच्या रोपट्याजवळ तुपाचा दिवा लावावा. या उपासनेसोबतच गुरूवारी उपवास केला तर बृहस्पतीची कृपादृष्टी होऊ शकते.

## तुम्ही सक्षम आहात का?

स्वमदत

सक्षम आणि समर्थ व्यक्तिमत्त्व ही काळची गरज आहे. तुमचं व्यक्तिमत्त्व सक्षम आहे हे पुढील संकेतांवरून ओळखता येईल...



* आपलं मन किती सक्षम आहे हे तुम्ही चांगलंच जाणता. इतरांच्या वागण्यामुळे तुमचं मन विचलित होत नाही. महत्त्वाचे प्रश्न, मुद्दे याबाबत इतरांशी चर्चा करायला तुम्हाला आवडतं. तुम्ही उत्तम प्रकारे वादविवाद करू शकता. इतरांच्या मतांचा तुम्ही आदर करता; सोबतच तुम्ही उद्धटपणे वागत नाही. वेगळ्या विचारांचा आदर करता.

* योग्य निर्णय घेण्यासाठी तुम्ही तुमच्या मनाचा कौल ग्राह्य धरता. सर्व पर्यायांचा विचार केल्यानंतर तुम्ही मनाला जे योग्य वाटतं ते ठरवता. तुमच्या आयुष्याचे निर्णय इतरांना घेऊ देत नाही.

* तुमचे काही निर्णय भावनिक असू शकतात. पण बरेचदा तुम्ही सत्याचा आणि परिस्थितीचा विचार करता. संपूर्ण परिस्थितीचा विचार करून तुम्ही निर्णय घेता.

* तुम्ही आपल्या मूल्यांना घट्ट धरून ठेवता. इतरांच्या सांगण्यावरून चुकीचा मार्ग पत्करत नाही. आयुष्यात तुम्हाला जे काही हवं आहे त्यासाठी तुम्ही संघर्ष करू शकता.

* इतरांना आनंदी करण्यात तुम्ही धन्यता मानत नाही. तत्त्वांसाठी तुम्ही कटू निर्णय घेता. तुमचा स्वत:वर पूर्ण विश्वास आहे. उद्दीष्ट साध्य करण्यासाठी इतरांना आनंदी करण्याची गरज आहे असं तुम्हाला वाटत नाही.

* आयुष्यात काय मिळवायचं आहे हे तुम्ही नीट जाणता. तरूणपणापासूनच तुम्ही आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित केलेलं असतं. वय वाढत गेलं की तुम्ही ते ध्येय प्राप्त करण्याच्या दिशेने कूच करता.

## महती लाकडी खडावांची

जाणून घ्या

पुरातन काळात साधू-संत, ऋषी-मुनी खडावा म्हणजे लाकडाची पादत्राणं घालत असत. अशा पादत्राणांच्या वापरामागे संतमंडळींचा वैज्ञानिक दृष्टीकोन होता. यजुर्वेदामध्येही लाकडाच्या पादुकांचा उल्लेख आढळतो. गुरूत्त्वाकर्षणाचा सिद्धांत शास्त्रज्ञांनी खूप नंतर मांडला. पण हा नियम साधूसंतांनी खूप आधीच जाणला होता. त्यानुसार ते वागत होते. गुरूत्त्वाकर्षणाच्या नियमानुसार शरीरात संचार करणाऱ्या विद्युत लहरी पृथ्वीच्या आत शोषल्या जातात. ही प्रक्रिया सतत सुरू राहिली तर शरीरातली जैविक शक्ती नष्ट होऊ शकते. ही शक्ती नष्ट होऊ नये यासाठी साधू-संत लाकडी खडावा वापरत असत. लाकडी खडावांमुळे विद्युतलहरींचा पृथ्वीच्या आकर्षणशक्तीशी थेट संपर्क होत नाही हे त्यांनी जाणलं होतं. जुन्या काळात चामड्याची पादत्राणं योग्य मानली जात नसत. धार्मिक कार्यांमध्ये चामड्याची पादत्राणं वापरणं निषिद्ध मानलं जात होतं. त्यामुळे अशी पादत्राणं वापरली गेली नाहीत. कापडाची पादत्राणं वापरणं शक्य नव्हतं. लाकडी पादत्राणांमुळे कोणत्याही धर्माच्या किंवा समाजाच्या भावना दुखावण्याचा प्रश्न नसल्याने अशी पादत्राणं वापरली जाऊ लागली. पुढच्या काळात या खडावा ऋषी-मुनींचं प्रतिक बनून गेल्या.



## ज्याचा त्याचा दृष्टीकोन



भक्ती बोध

गौतम बुद्धांनी आपल्या प्रवचनांमधून भक्तमंडळींना उपदेश केला आहे. असंच एकदा ङ्गजागृत व्हा, वेळ निघून चालली आहेङ्घ असं म्हणत त्यांनी प्रवचन संपवलं. प्रवचनानंतर शिष्य आनंदसोबत ते फिरायला गेले. विहाराच्या प्रवेशद्वारावर पोहोचल्यानंतर दोघं बाजूला उभे राहिले. प्रवचनासाठी आलेले लोक घरी निघाले होते. त्यामुळे दारापाशी बरीच गर्दी झाली होती. या गर्दीतून एक महिला बुद्धांना भेटायला आली. ती म्हणाली, तथागत, मी एक नृत्यांगना आहे. आज नगरातल्या मोठ्या व्यावसायिकाकडे माझा नृत्याचा कार्यक्रम आहे. पण हे माझ्या डोक्यातच नव्हतं. तुम्ही वेळ निघून चालल्याचं सांगितलं आणि मला कार्यक्रम आठवला. त्याबद्दल तुमचे आभार. असं म्हणून ती निघून गेली.

यानंतर एक दरोडेखोर बुद्धांकडे आला आणि म्हणाला, मी आपल्यापासून काहीही लपवू इच्छित नाही. मला एके ठिकाणी दरोडा घालायला जायचं आहे. मी हे पूर्णपणे विसरून गेलो होतो. पण तुमच्या वाक्याने मला ते आठवलं. त्याबद्दल तुमचे आभार. दरोडेखोर निघून गेल्यानंतर एक वृद्ध बुद्धांकडे आला आणि म्हणाला, मी आयुष्यभर भौतिक सुखाच्या मागे पळत राहिलो. आता मृत्यू जवळ येऊ लागला आहे. आयुष्य असंच वाया गेलं असं मला वाटू लागलं आहे. तुमच्या उपदेशाने माझे डोळे उघडले आहेत. आता मी सगळे मोह सोडून आत्मकल्याणासाठी झटणार आहे.

सगळे लोक निघून गेल्यावर बुद्ध आनंदला म्हणाले, बघ आनंद, मी एकच प्रवचन दिलं. पण प्रत्येकाने आपापल्या परीने त्याचा अर्थ लावला. ज्याची जितकी झोळी, तितकंच दान तो जमवू शकतो. आत्म कल्याणासाठी मनाला तितकं सक्षम आणि लायक बनवायला हवं. यासाठी मनाची शुद्धता महत्त्वाची आहे.

# ग्रामपंचायत सदस्याच्या घरावर पेट्रोल बॉम्ब हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २४ :

भंडारा जिल्ह्यातील शहापूर परिसरात पहाटेच्या सुमारास घडलेल्या एका धक्कादायक घटनेने संपूर्ण गाव हादरून गेले आहे. ग्रामपंचायत सदस्याच्या घरावर थेट पेट्रोल बॉम्ब हल्ला करून कुटुंबाला जिवंत जाळण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. सुदैवाने, कुटुंबीय जागे असल्याने आणि त्यांनी प्रसंगावधान राखल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र या हल्ल्यात घरासमोरील वाहने पूर्णपणे जळून खाक झाली असून, मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

शहापूर ग्रामपंचायतीचे सदस्य सचिन गाडेकर यांच्या घरावर अज्ञात हल्लेखोरांनी हा हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. पहाटेच्या शांततेत अचानकपणे घराच्या आवारात पेट्रोल बॉम्ब फेकण्यात आला. बॉम्ब फुटताच आगीने रौद्र रूप धारण केले. घराच्या अंगणात उभ्या असलेल्या चार दुचाकी आणि घरासमोरील एक कार यांना आग लागली. काही मिनिटांतच या सर्व वाहनांनी पेट घेतला आणि पाहता पाहता ती पूर्णपणे जळून खाक झाली. घरालाही आग लागण्याची शक्यता निर्माण झाली होती, मात्र प्रसंग वेळीच लक्षात आल्याने मोठा अनर्थ टळला.

आग लागल्याचे लक्षात येताच गाडेकर कुटुंबीयांनी आरडाओरड सुरू केली. त्यांच्या आवाजामुळे शेजारील नागरिक तात्काळ घटनास्थळी धावून आले. नागरिक जमा होत असल्याचे पाहून हल्लेखोरांनी तातडीने पळ काढल्याचे सांगितले जात आहे.



स्थानिक नागरिकांनी पाणी आणि इतर साधनांच्या मदतीने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. तोपर्यंत वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या घटनेमागे वैयक्तिक वाद, जुन्या भांडणातून सूड की राजकीय कारण, याबाबत अद्याप कोणतीही स्पष्ट माहिती समोर आलेली नाही.

घटनेची माहिती मिळताच जवाहरनगर पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. अज्ञात हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी तपासाची चक्रे वेगाने फिरवली जात आहेत. ग्रामपंचायत सदस्याच्या घरावर थेट पेट्रोल बॉम्ब हल्ला झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि भीतीचे वातावरण आहे. या घटनेने भंडारा जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून, आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

# राज्यातील सर्व पूर्व प्राथमिक शाळा शासनाच्या अखत्यारित आणणार

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २४ :

राज्यातील सर्व पूर्व प्राथमिक शाळा शासनाच्या अखत्यारित आणणार, अशी घोषणा शनिवारी गृह व शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी केली. बदलापूर येथे गुरुवारी चार वर्षांच्या चिमुकलीवर व्हॅनचालकाकडून अत्याचारप्रकरणाची गंभीर दखल घेत त्यांनी याबाबत कायद्या करण्यात येत असल्याचे सांगितले. बदलापूरसारख्या घटनांना आळा घालण्यासाठी शालेय शिक्षण, गृह व परिवहन विभागाची एकत्रित बैठक घेऊन ठोस उपाययोजना केल्या जातील, असेही त्यांनी नमुद केले.

गृह व शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर आज नागपुरात प्रसारमाध्यमासोबत बोलत होते. ते म्हणाले, पूर्व प्राथमिक शाळा शासनाच्या अखत्यारित असण्याबाबत आतापर्यंत काहीही तरतूद नव्हती. ही बाब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. पूर्व प्राथमिक शाळांबाबत कायदा करण्यासाठी शासनाला सूचना दिल्या आहेत. कायदा तयार करून राज्यातील सर्व पूर्व प्राथमिक शाळा शासनाच्या अखत्यारित आणण्यात येईल. एक अभ्यासगट तयार करून या कायद्याचा मसुदा तयार करण्यात आला आहे. शाळेची नियमावली कशी असावी, काय सुविधा असावी, मनुष्यबळ कशाप्रकारे कार्यरत असावे, याबाबत सूचना करण्यात आल्या आहेत. कायद्याचा हा मसुदा पूर्णपणे तयार झाल्यानंतर विधीमंडळाची मान्यता घेण्यात येईल. अशा घटनेनंतर प्रशासन आणखी गंभीर झाले असून शालेय शिक्षण विभाग, परिवहन विभाग आणि गृह विभाग यांची एकत्रित बैठक घेऊन कार्यप्रणाली मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. बदलापूर येथील घटनेतील आरोपीला अटक करण्यात आली असून व्हॅन जप्त करण्यात आली आहे. व्हॅनचा परवानही निलंबित करण्यात आल्याचे त्यांनी नमुद केले.



बदलापूर घटनेनंतर शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांची घोषणा

बदलापूर येथे चार वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचा धक्कादायक प्रकार गुरुवारी उघड झाला. बदलापूर पश्चिमेकडील नामांकित एका खाजगी शाळेत चार वर्षांची चिमुकली शिकत होती. ती नेहमीप्रमाणे दुपारी १२.३० वाजेपर्यंत स्कूलव्हॅन मधून घरी न परतल्यामुळे तिच्या आईने व्हॅन चालकाकडे फोन करून विचारणा केली. त्यानंतर साधारण दीड तासानंतर चिमुकली घरी आली. ती अत्यंत भेदरलेल्या अवस्थेत होती.

तिच्या आईने तिच्याकडे विचारणा केली असता तिने घडलेला प्रकार आईला सांगितला. त्यानंतर चिमुकलीच्या पालकांनी तत्काळ पोलीस स्टेशनमध्ये धाव घेतली. पोलिसांनी व्हॅन चालकाला अटक केली असून गुन्हा दाखल केला आहे.

## पक्षकाराची फसवणूक करणाऱ्या वकीलावरच तीन कोटीचा दावा

■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २४ :

आर्वी येथील वकील रमेश धारस्कार याने रामदास अजमिरे यांची फसवणूक केली, म्हणून रामदास अजमिरे यांनी रमेश धारस्कर या वकिलाची बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा यांच्याकडे तक्रार केली असता, त्याचे वकिलीचे लायसन रद्द झाले होते. त्याविरुद्ध रमेश धारस्कर याने माननीय सर्वोच्च न्यायालयात अपील केली होती त्यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने रमेश धारस्कर याने रामदास अजमिरे यांची फसवणूक केली, याबाबतचा निकाल कायम ठेवला. त्याला महासागर या वृत्तपत्राने त्यावेळी चांगली प्रसिद्धी दिली होती.

रमेश धारस्कर या वकिलाने रामदास अजमिरे यांची फसवणूक केली, ही बाब सर्वोच्च न्यायालयापर्यंत निश्चित झाल्याने रामदास अजमिरे यांनी रमेश धारस्कर या वकिलाविरोधात आर्वी न्यायालयात तीन कोटी बांन्सी लाख रुपयाचा मानहानीचा दावा दाखल केला आहे. त्याचे सविस्तर वृत्त असे आहे की, रामदास अजमिरे यांनी भार्गव यांच्याकडून आर्वी बस स्टॉप जवळील मालमत्ता विकत घेतली होती. त्या विक्री करिता रामदास अजमिरे यांनी वकील रमेश धारस्कार याची नियुक्ती केली होती. रमेश धारस्कार या वकिलाने एका बाजूने रामदास अजमिरे याला घराचीची विक्री करून दिली तर दुसऱ्या बाजूने भार्गव यांचे भावाकडून दावा दाखल केला व लगेच रामदास अजमिरे यांना माहित न होऊ देता तो दावा आपसी केला.

त्यानंतर रामदास अजमिरे यांना रमेश धारस्कार याने बँक ऑफ हैदराबाद या बँक चा खोटा सर्च रिपोर्ट देऊन रामदास अजमिरे हें त्या पूर्ण घराचे मालकच नाही, अशा कळविले. ही बाब रामदास अजमिरे यांना माहीत होताच त्यांनी त्याबाबत पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला व भार्गव त्यांचे विरोधात दिवाणी दावा दाखल केला. पक्षकार रामदास अजमिरे यांची रमेश धारस्कार या वकिलाने फसवणूक केली, म्हणून त्याचा वकिलीचा परवाना रद्द करण्यासाठी बार कौन्सिल ला तक्रार केली असता त्या तक्रारीमध्ये बार कॉन्सिलने व व त्यानंतर अपील मध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने रामदास अजमिरे यांची फसवणूक झाल्याचे मान्य करून रमेश धारस्कर या वकिलाचा वकिलीचा परवाना रद्द केला होता. आता रामदास अजमिरे यांनी आर्वी न्यायालयात रमेश धारस्कर या वकिला विरोधात नुकसान भरपाईचा दावा दाखल केलेला आहे.

## पुनर्वसित भिक्षेकऱ्यांना दिल्लीतील प्रजासत्ताक दिन परेडसाठी विशेष आमंत्रण



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

नागपूर महानगरपालिका व सह्याद्री फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने राबविण्यात येत असलेला आस्था भिक्षेकरी पुनर्वसन निवारा केंद्र हा उपक्रम समाजातील वंचित घटकांसाठी आशेचा किरण ठरत आहे. मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांचे पुढ़ाकारातुन व अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी तसेच उपायुक्त डॉ. रंजना लाडे यांच्या मार्गदर्शनाखाली काम सुरु असून, सन २०२२ पासून या उपक्रमांतर्गत १३३० हून अधिक भिक्षेकऱ्यांचे बचाव, पुनर्वसन व समाजाच्या मुख्य प्रवाहात पुनर्समावेशन करण्यात आले आहे. निवारा, आरोग्यसेवा, समुपदेशन, कौशल्य विकास वरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत त्यांना सन्मानाचे जीवन जगण्याची संधी देण्यात आली आहे. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत, नागपूर येथील तीन पुनर्वसित लाभार्थ्यांना २६ जानेवारी रोजी होणाऱ्या प्रजासत्ताक दिन कार्यक्रमास देशभरातून निवडलेल्या १०० विशेष आमंत्रितांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. निवड झालेले लाभार्थी पुढीलप्रमाणेः शरीफ शेख (वय : ६१ वर्षे), अनिल जुनघरे (वय : ५२ वर्षे), गायाबाई शुक्ला (वय : ७० वर्षे) स्माइल आस्था उपक्रम बाबत प्रशंसनीय स्वयंलिखित पत्र व नागपुर प्रतीक असलेले झीरो माइल प्रतिमा तसेच राष्ट्रपती व प्रधानमंत्री छायाचित्र ते भेट स्वरूप देनार आहे.

नागपूर महानगरपालिका व सह्याद्री फाउंडेशन यांच्या वतीने सांगण्यात आले की, आस्था व स्माइल उपक्रम हा भिक्षेकरीमुक्त, सर्वसमावेशक आणि सशक्त समाजनिर्मितीच्या भारत सरकारच्या दृष्टीकोनाशी सुसंगत असून, पुनर्वसनाच्या माध्यमातून गरजू व्यक्तींना आत्मनिर्भर बनविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहे. राष्ट्रीय पातळीवरील या महत्त्वाच्या कार्यक्रमात पुनर्वसित लाभार्थ्यांचा सहभाग हा शासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि स्वयंसेवी संस्थांच्या संयुक्त प्रयत्नांचा यशस्वी परिणाम आहे.

## विद्यार्थ्यास लोखंडी पट्टीने मारहाण

■ महासागर प्रतिनिधी बुलढाणा, दि. २४ :

खामगाव तालुक्यातील पिंपळगाव राजा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांला मारहाणीची घटना घडल्याचे समोर आले आहे. इयत्ता चौथीत शिकणाऱ्या नाथजोगी समाजातील चिमुकल्या विद्यार्थ्याला शिक्षकाने लोखंडी पट्टी (स्केल)ने मारहाण केली. या मारहाणीमुळे या चिमुकल्याच्या पाठ, मांडी, हात, कंबरेवर वळ उमटले आहे.

पिंपळगाव राजा गावातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील चिम नामक शिक्षकाने शुक्रवारी (२३ जानेवारी) स्केल पट्टीने चौथीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची पाठ सोलून काढली. यामुळे गंभीररित्या जखमी विद्यार्थ्याला खामगाव येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी भरती करण्यात आले आहे.

प्रारंभी हे प्रकरण दाबायचा प्रयत्न करण्यात आल्याची चर्चा आहे. मात्र काल संध्याकाळी ही बाब व शिक्षकाचा प्रताप चव्हाट्यावर आला. पवन नारायण इंगळे (१०, रा. हरिप्रसाद वसाहत, पिंपाळगाव राजा, ता. खामगाव) असे पीडित बालकाचे नाव आहे. विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर आले नाही म्हणून आरोपी शिक्षक चिम याने या विद्यार्थ्याला मारहाण केली.

या प्रकरणी रोष वाढल्यावर आज शनिवारी शिक्षकाविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले.

पीडित मुलाचे वडील नारायण इंगळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून आणि वैद्यकीय अहवालवरून पिंपाळगाव राजा पोलिसांनी ही कारवाई केली आहे. ठाणेदारांच्या मार्गदर्शनात पोलीस हवालदार धीरज देशमुख या गंभीर घटनेचा तपास करीत आहे.

## पोलिस उपनिरीक्षकासह चौघे निलंबित

**जरीपटका ठाण्याच्या कोठडीत आत्महत्या प्रकरण**

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २४ :

अपहरण आणि पोक्सोच्या आरोपात जरीपटका पोलिसांच्या कोठडीत असलेल्या तरुणाने चादरीने गळफास लावून आत्महत्या केली होती. या प्रकरणात निष्काळजीपणाचा ठपका ठेवत एका पोलिस उपनिरीक्षकासह चार कर्मचाऱ्यांना तडका-फडकी निलंबित करण्यात आले आहे. पोलिस उपायुक्तांनी पाठवलेल्या प्रस्तावाला पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी मान्यता देत निलंबनाचे आदेश दिले. निलंबित अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये पोउपनि नितीन आत्राम, हवालदार अमोल खडसे, राहुल चव्हाण आणि प्रमोद दुधकावळे यांचा समावेश आहे.

उत्तरप्रदेशातील प्रयागराजच्या हंडिया गावी राहणाऱ्या नागेंद्रकुमार रामजी भाटिया (१९) याच्यावर जरीपटका परिसरात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीला पळवून नेत तिच्याशी लैंगिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप होता. पीडितेच्या कुटुंबीयांनी दिलेल्या तक्रारीनंतर जरीपटका पोलिसांनी त्याला प्रयागराज पोलिसांच्या मदतीने उत्तर प्रदेशातून अटक केली होती. बुधावारी त्याला न्यायालयाने दोन दिवसांच्या पोलिस कोठडीत पाठवले. यामुळे व्यथित नागेंद्रने गुरुवारी पहाटे कोठडीत गळफास लावून आत्महत्या केली. सकाळी ठाण्यातील कर्मचाऱ्यांना नागेंद्र हा गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला होता. घटनेच्या वेळी पोउपनि आत्राम, हवालदार खडसे, चव्हाण आणि दुधकावळे हे कर्तव्यावर होते. नागेंद्रकुमारवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. मात्र ३ वाजतानंतर त्यांनी एकदाही त्याच्याकडे येऊन पाहिले नाही. विशेष म्हणजे आत्महत्या करण्यापूर्वी जवळपास २० मिनिटे तो कोठडीत फेऱ्या मारत होता. या दरम्यान एकानेही त्याच्याकडे येऊन पाहिले असते तर ही घटना घडली नसती. या प्रकाराची गंभीर दखल घेत पोलिस उपायुक्तांनी चौघांच्याही निलंबनाचा प्रस्ताव सहआयुक्त रेड्डी यांच्याकडे पाठवला. या प्रस्तावाला पोलिस आयुक्तांनी मान्यता दिली. निलंबित करण्यात आलेल्या चारही पोलिसांची विभागीय चौकशी समितीद्वारे चौकशी करण्याचे आदेशही पोलिस आयुक्तांनी दिले आहेत. दरम्यान नागेंद्रला पोलिस कोठडीत जबर मारहाण केल्याची चर्चा आहे. सांगण्यात येते की, गुरुवारी पोलिस पुन्हा त्याच्या पोलिस कोठडीची मागणी करणार होते. त्याला पोलिसांकडून पुन्हा मारहाण करण्याची धमकी देण्यात आली होती. यामुळे नागेंद्र तणावात होता. नागेंद्रच्या वडिलांनीही त्याला या प्रकरणातून बाहेर काढण्यासाठी ५ लाख रुपयांची मागणी करण्यात आल्याचा आरोप केला आहे.

## अतिदुर्गम बिनागुंडा येथे २४ तासांत पोलीस ठाण्याची स्थापना

■ महासागर प्रतिनिधी गडचिरोली, दि. २४ :

एकेकाळी नक्षलवाद्यांचा सर्वात सुरक्षित गड मानल्या जाणाऱ्या आणि भौगोलिकदृष्ट्या अत्यंत दुर्गम असलेल्या भामरागड उपविभागातील बिनागुंडा गावात गडचिरोली पोलीस दलाने धाडसी पाऊल उचलले आहे.

छत्तीसगडच्या सीमेपासून अवघ्या ८ किमी अंतरावर असलेल्या या गावात केवळ २४ तासांत सर्व सुविधायुक्त नवीन पोलीस मदत केंद्र उभारून प्रशासनाने नक्षलवाद्यांना मोठा धक्का दिला आहे. १००० हून अधिक सी-६० कमांडो, १८ बीडीडीएस पथके आणि आधुनिक यंत्रसामग्रीच्या मदतीने हे मिशन फत्ते करण्यात आले.




बिनागुंडा हा भाग वर्षानुवर्षे विकासापासून कोसो दूर होता. पावसाळ्यात गुंडेनूर नाल्याला पूर आला की बिनागुंडासह बंगाडी, कुवाकोडी, फोदेवाडा या गावांचा संपर्क चार महिन्यांसाठी पूर्णपणे तुटायचा. आता या ठिकाणी पोलीस मदत केंद्र स्थापन झाल्याने या नाल्यावरील पुलाचे बांधकाम आणि प्रलंबित ७ मोबाईल टॉवरच्या उभारणीला आवश्यक सुरक्षा कवच मिळणार आहे. याशिवाय, राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी आणि दुर्गम भागात एसटी बस सेवा सुरू करण्यासाठी हे केंद्र मैलाचा दगड ठरणार आहे.

एका दिवसात लष्करी छावणीप्रमाणे हे केंद्र उभारण्यासाठी ११ जेसीबी, १० ट्रेलर, ५ पोकलेन आणि ४० ट्रकचा राबता होता. केंद्रात वायफाय, पोर्टा कॅबिन, जनरेटर शेड आणि शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी आर.ओ.प्लांट उभारण्यात आला आहे. उद्घाटन प्रसंगी विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील, पोलीस उप-महानिरीक्षक अंकित गोयल, पोलीस अधीक्षक नीलोत्पल आणि सीआरपीएफचे कमांडंट शंभू कुमार उपस्थित होते.

## मानवी वस्तीत शिरलेल्या निष्पाप चितळाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, लाखांदूर, दि. २४ :

जंगलातील अन्नाचा शोध घेत मानवी वस्तीत शिरलेल्या एका निष्पाप चितळाचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना आज शनिवारी (ता.२४) लाखांदूर शहरात घडली. निसर्गाच्या साखळीतील हा सुंदर प्राणी अन्नाच्या शोधात थेट शहरात पोहोचला, मात्र त्याचे नशीब बलवत्तर नव्हते. शनिवारला सकाळी ११ वाजेच्या सुमारास लाखांदूर शहरातील वॉर्ड क्रमांक १२ मध्ये ही घटना उघडकीस आली.

प्राप्त माहितीनुसार स्थानिक रहिवासी मुक्ताबाई रमेश देसाई यांच्या घरासमोरील अंगणात एक चितळ मृतावस्थेत पडून असल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास आले. भर वस्तीत चितळ मृतावस्थेत आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी विलंब न करता लाखांदूर वन विभागाला पाचारण केले.

# सखारामपूर येथे श्री संत सखाराम महाराजांचा ७९ वा पुण्यतिथी सोहळा साजरा

■ महासागर प्रतिनिधी अकोला, दि. २४ :

संग्रामपूर तालुक्यातील सखारामपूर येथे संत सखाराम महाराजांचा ७९ वा पुण्यतिथी सोहळा भक्तीमय व उत्साही वातावरणात मोठ्या जल्लोषात पार पडला. तीन दिवसाच्या यात्रेमध्ये कोणत्याही प्रकारचा तमाशा आर्केस्ट्रा सिनेमा टॉकीज येथे आढळणार नाही या यात्रेचे विशेष आकर्षण म्हणजे वारकरी संप्रदायाच्या तब्बल २००१ हून अधिक दिंड्यांचा सहभाग होता.

२२ तारखेला विविध भागांतून वारकरी आपल्या दिंड्या घेऊन सखारामपूर येथे दाखल झाले. २३ तारखेला मुख्य यात्रा उत्साहात पार पडली. तर २४ तारखेला काल्याच्या किर्तनानंतर वारकरी आपापल्या दिंड्यांसह आपल्या गावांकडे परतीच्या प्रवासाला निघाले. सखारामपूर संस्थानाला वऱ्हाळाची काशी म्हणून ओळखले जाते. या ठिकाणी बहुजन समाजातील वारकरी मोठ्या संख्येने एकत्र येत असून तीन दिवस विविध धार्मिक, सांप्रदायिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. संत सखाराम महाराजांनी आपल्या कीर्तनातून व आध्यात्मिक विचारांतून समाज प्रबोधनाचे मोठे कार्य केले. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त सखारामपूर येथे हरीनामाचा भव्य सोहळा अनुभवायला मिळतो.



या संस्थानाची गादी सांभाळणारे गुरुवर्य ह.भ.प. तुकाराम महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानाचा कारभार मोठ्या प्रमाणात विस्तारला आहे. तसेच अनेक वर्षांपासून होत असलेल्या या यात्रा महोत्सवासाठी गुरुवर्य गोपाळ महाराज व गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांचे मोलाचे योगदान लाभले आहे. २४ तारखेला गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने यात्रा महोत्सवाची सांगता झाली.

# संजिवनी हॉस्पिटलमध्ये प्रथम रोबोटिक हिप व गुडघा शस्त्रक्रिया युनिटला प्रारंभ

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २४ :

संजिवनी हॉस्पिटलमध्ये मध्य भारतातील पहिले ROSA रोबोटिक हिप व गुडघा शस्त्रक्रिया युनिट सुरू करण्यात येत असल्याची घोषणा संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे प्रमुख अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. सुश्रुत राजन यांनी पत्रकार परिषदेत केली. या युनिटमध्ये अमेरिकेतील जागतिक कीर्तीची ROSA (रोबोटिक सर्जिकल असिस्टंट) - झीमर प्रणाली वापरण्यात येणार आहे. या महत्त्वपूर्ण वैद्यकीय घडामोडीचे औचित्य साधून तसेच हाडांच्या आरोग्याविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने, नागरिकांसाठी सोमवार, २६ जानेवारी २०२६ रोजी मोफत बोन मिनरल डेनसिटी तपासणी, कंबर व गुडघ्यांच्या विकारांसाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी २ ते ५ वाजेदरम्यान संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, आठ रस्ता चौक, लक्ष्मी नगर, नागपूर येथे होणा-या या शिबिरात रुग्णांना तज्ज्ञांचे मार्गदर्शन व सल्ला दिला जाणार आहे. पारंपरिक



सांधेबदल शस्त्रक्रियेमध्ये शल्यचिकित्सकाच्या अनुभवावर आधारित अंदाजावर अवलंबून राहावे लागते. मात्र ROSA प्रणाली ही मानवी शरीरासाठी अत्याधुनिक जीपीएसप्रमाणे कार्य करते. रिअल-टाइम डेटा आणि 3D मॉडेलिंगच्या साहाय्याने रोबोट शल्यचिकित्सकाला इम्प्लांट अत्यंत अचूकपणे, अगदी सूक्ष्म पातळीवर बसविण्यास मदत करते. डॉ. सुश्रुत राजन म्हणाले, प्रत्येक व्यक्तीचे शरीर वेगळे असते. त्यांची हाडांची रचनाही वेगळी असते. ROSA प्रणालीमुळे रुग्णाच्या हाडांच्या रचनेनुसार अचूक शस्त्रक्रिया करणे सोपे जाते. हाडांची अचूक मांडणी सांधा नैसर्गिक वाटावा व रुग्णाला नैसर्गिकरित्या हालचाल करता यावी तसेच, सांधा अधिक काळ टिकण्यासाठी मदत करते. अपंगत्व टाळण्यासाठी लवकर निदान महत्त्वाचे असल्याची जाणीव ठेवून, संजिवनी हॉस्पिटलतर्फे दीर्घकाळ सांधेदुखी, जडपणा किंवा चालण्यात अडचण असलेल्या रुग्णांसाठी विशेष तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. राजन पुढे म्हणाले, जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान केवळ उपलब्धच नव्हे तर सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावे, ही आमची भूमिका आहे. या शिबिराच्या माध्यमातून आम्ही समाजाला परतफेड करण्याचा आणि प्रगत रोबोटिक उपचारांचा लाभ घेऊ शकणाऱ्या रुग्णांची ओळख पटवण्याचा प्रयत्न करत आहोत. मोफत शिबिरासाठी नोंदणी अनिवार्य आहे. इच्छुक रुग्णांनी ८३६९२१६७६० या क्रमांकावर संपर्क साधून आपली वेळ निश्चित करावी.

या पत्रकार परिषदेला डॉ. सुश्रुत राजन यांनी संबोधित केले. यावेळी ज्येष्ठ अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. के. एस. राजन, डॉ. भाग्यलक्ष्मी राजन तसेच डॉ. साक्षी रस्तोगी उपस्थित होत्या.

**रोबोटिक शस्त्रक्रियेचे रुग्णांना फायदे**

* जलद बरे होणेः शस्त्रक्रियेनंतर काही तासांतच रुग्ण चालण्यास सक्षम होतो.
* कमी वेदनाः लहान छेद आणि अचूक हाडकापणीमुळे आजूबाजूच्या टिश्यूंना कमी इजा होते.
* दीर्घकालीन परिणामः अचूक मांडणीमुळे इम्प्लांटची झीज कमी होते.